दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१३४ बुधवार दि.०४ सप्टेंबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

अतिवृष्टी पुन्हा मारक ठरण्याची शक्यता!

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मोसमातील पहिली अतिवृष्टी झाली. हिंगोली, बीड, परभणी, नांदेड, लातूर जिल्ह्यांत रविवारपासून जोरदार पाऊस होत आहे त्यामुळे अनेक शहरांतील जनजीवन विस्कळीत झाले असून सखल भागात पाणी भरले. सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. गणेशोत्सव काळात देशात व राज्यात जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. या महिन्यात सरासरीहून अधिक पाऊस म्हणजे १०९ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा १६ टक्के अधिक पाऊस झाला. त्या पेक्षाही अधिक पाऊस सप्टेंबर महिन्यात होईल, असा अंदाज आहे.

लाडक्या भावांच्या खात्यातही पैसे जमा होणार

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या घोषणेपासून आजपर्यंत राज्यात १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ६० हजाराहून अधिक युवा राज्यातील खाजगी तसेच शासकीय संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. विशेष म्हणजे आत्तापर्यंत २ लाखांपेक्षा जास्त युवकांनी या योजनेसाठी नोंदणी केली असून ८ हजार १७० आस्थापनांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळणार आहे.

मराठवाड्यात अतिवृष्टीने लाखो हेक्टरवरील पिके पाण्यात

अद्याप पंचनामे नाही; पाण्यात बुडून तसेच वीज पडून १२ जणांचा मृत्यू

संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यात मागील दोन दिवसात बेफाम पावसाने १२ ठार झाले आहे. पावसाने दाणादाण उडाली असून परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यात ५ लाख ८ हजार ६८ हेक्टर तर बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अंदाजे ८ ते १० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसात अर्ध्याहून अधिक महसूलमंडळात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली असून पुरात वाहून, पाण्यात बुडून तसेच वीज पडल्याने १२ जणांचा मृत्यू झाला आहे.

नुकसान मोठे झाले असले तरी **अद्याप पंचनामे मात्र करण्यास सुरुवात झालेली नाही.**

मराठवाड्यात मागील ४८ तासांपासून मुसळधार पावसामुळे ओढे आणि नद्यांना पूर आलाय. शेतात

◀◀ पान २ वर

नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

प्रकल्पामध्ये सततच्या पावसामुळे वाढ होत असून नदी धरणे व बंधाऱ्यांपुढील नदीपात्रा नजीक राहणाऱ्या नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आदेश देण्यात आले आहे. धरणामध्ये येणारा पाण्याचा नवीन प्रवाह. या महिन्यात धरणामध्ये ठेवायचा जलसाठा हे लक्षात घेऊन प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात येतात. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास अधिकअतिवृष्टी झाल्यास अधिक प्रमाणात पाणी सोडले जाऊ शकते. त्यामुळे या सर्व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

कर्नाटकची चूक; महाराष्ट्रातील ५,५०० हेक्टर शेतीचे नुकसान

कर्नाटक पाटबंधाकेर विभागाची चूक महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना भोवल्याचे आता समोर आले आहे. पावसाचा मोठा फटका येथील शेतकऱ्यांना बसला असून प्रार्थमिक अंदाजानुसार साडेपाच हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. बाधित क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता असून औराद शहाजानी, जळकोट, औसा भागातील बळीराजाचे मोठ नुकसान झाले आहे.

१ हजार ४५४ गावांमध्ये नुकसान

मराठवाड्यातील १ हजार ४५४ गावांमध्ये नुकसान झाले असून १६९ जनावरे दगावली असून ६२१ पुराच्या पाण्याने नुकसान झाले आहे. मुसळधार पावसानं अनेक गावांना पुराचा वेढा लागला असून अनेक नदीकाठची गावं पाण्याखाली गेल्याचे चित्र आहे. नांदेड जिल्ह्यात गेल्या ३६ तासांमध्ये पावसाचा जोर कायम असून अजूनही पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील २६ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातून पाणी सोडले जात आहे. नदी नाले ओसंडून वाहत असून नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये १२ जनावरे मृत्युमुखी पडली असून २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे. आपत्ती व्यवस्थापन, कृषी, पाटबंधारे, महसूल व पोलीस विभाग स्थितीवर लक्ष ठेवून असून ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे.

स्व.विनायक मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान

- पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी स्विकारला पुरस्कार

Maharashtra Legislature
In dignified presence of
Smt. Droupadi Murmu

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे देण्यात येणारा महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना जाहीर झाला मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांना मृत्यू पश्चात हा पुरस्कार देण्यात आला त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराची घोषणा होताच मंचावर उपस्थित मान्यवरांनी आणि सभागृहातील उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. विधिमंडळाच्या कामकाजातील

◀◀ पान २ वर

धनंजय मुंडे पूरग्रस्त परळीकरांच्या भेटीला

पुरग्रस्तांची भेट घेत नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश; प्रशासनास तातडीने मदतीचे निर्देश, घरात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची नाथ प्रतिष्ठान करणार व्यवस्था

परळी वै.। प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज परळी शहरात सोमवारी झालेल्या पावसाने पुराचे पाणी शिरलेल्या विविध भागांमध्ये भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. पूरग्रस्त नागरिकांना भेटी देत चर्चा करून धनंजय मुंडे यांनी नागरिकांना दिलासा दिला. यावेळी पुरामुळे घरात पाणी शिरून झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले.

मागील दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सरस्वती नदीस मंगळवारी सकाळी पूर येऊन नदीकाठच्या अनेक वस्त्यांमधील घरामध्ये पाणी शिरले होते. अंबेवेस भागासह अनेक गल्लीत पाणी शिरले होते. या पाण्यातून मार्ग काढीत राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी दुपारी शहरातील पूरग्रस्त भागात भेट देऊन तेथील नुकसानग्रस्त नागरिकांची कैफियत ऐकून घेतली व नगरपालिका प्रशासनास स्वच्छता करून व तेथील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या. घरात पाणी शिरून धन–धान्याचे नुकसान झालेल्या नागरिकांना तहसील मार्फत तात्काळ आपत्ती प्रतिसाद निधी देण्याची कार्यवाही करणे त्याचबरोबर नाथ प्रतिष्ठान च्या वतीने घरात–संसारात पाणी शिरलेल्या नागरिकांच्या भोजनाची व्यवस्था करण्याच्या सूचनाही धनंजय मुंडे यांनी दिल्या आहेत. यावेळी त्यांच्यासोबत परळीचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नगरपालिकेचे उपमुख्यअधिकारी संतोष रोडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, श्रीकृष्ण कराड, अनंत इंगळे , राहुल ताटे,तखी खान आदी

◀◀ पान २ वर

बलात्काऱ्यांना १० दिवसांत फाशी

विधानसभेत विधेयक मंजूर,कायद्यात महत्वाची तरतूद

कोलकाता । वृतसंस्था

पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे देशभर संतापाची लाट उसळल्याचे दिसून आले आहे. तर, महाराष्ट्रातील बदलापूर येथील बाललैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकारनेही शाळेसंदर्भात कडक नियमावली जारी केली आहे. त्यामुळे, महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत सर्वच सरकार गंभीर बनल्याचं दिसून येते. आता देशातील एका राज्याने नवे विधेयक मंजूर केले असून बलात्कारांना १० दिवसात फाशी देण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही गेल्याच आठवड्यात आपल्या भाषणात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवर भाष्य केले होते. कोलकाता येथील बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज पश्चिम बंगाल विधानसभेत बलात्कार विरोधी विधेयकावरील चर्चेत सहभाग घेतला. यावेळी, कोलकाता प्रशिक्षणार्थी बलात्कार आणि हत्या प्रकरणात आम्ही सीबीआयकडून न्यायाची अपेक्षा करतो. दोषींना फाशीची शिक्षा ठोठावण्यात यावी, असे ममता यांनी म्हटले. तत्पूर्वी, आज अपराजिता विधेयक म्हणजेच अँटी रेप विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे.

◀◀ पान २ वर

राज्यात शरद पवार तर बीड जिल्ह्याच्या राजकारणात साहेबराव दरेकर अजूनही तरुण

नगरचे खा.निलेश लंके यांचे गौरवोद्गार; माजी आमदार साहेबराव दरेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

आष्टी । प्रतिनिधी

राजकारणामध्ये वय किती झाले आहे, यापेक्षा जास्त वय होऊ नये तुम्ही सर्वसामान्यांच्या मनावर कसा प्रभाव टाकू शकता हे महत्त्वाचे असते. महाराष्ट्राच्या राजकारणात आमचे नेते शरद पवार आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये माजी आमदार साहेबराव दरेकर हे कायम तरुण आहेत. तरुणाला लाजवेल असे काम सध्या दरेकर करत असल्याचे नगरचे खासदार निलेश लंके यांनी अभिष्टचिंतन सोहळ्यामध्ये गौरवोद्गार काढले.

माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.. या कार्यक्रमाला नगरचे खासदार निलेश लंके यांच्यासह माजी मंत्री शिवाजीराव पंडित, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार जनार्दन तुपे, माजी आमदार राजेंद्र जगताप , शिवसेनेचे माजी नगर जिल्हाध्यक्ष शशिकांत गाडे,

मा.आ.साहेबरावजी दरेकर (नाना) यांचा
अभिष्टचिंतन सोहळा
03 सप्टेंबर

◀◀ पान २ वर

मला मिळालेला उत्कृष्ट भाषण पुरस्कार हा जनतेचा पुरस्कार -आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रकुल संसदीय मंडळ,महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२० – २१ करिता देण्यात येणारा ''उत्कृष्ट भाषण पुरस्कार'' राष्ट्रपती यांच्या शुभहस्ते दि ०३ सप्टेंबर मंगळवार रोजी विधिमंडळ मुंबई येथे आ.प्रकाश सोळंके यांनी स्वीकारला.

यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी बोलताना सांगितले की,मला चौथ्यांदा आमदार म्हणून माजलगाव मतदारसंघातील जनतेने काम करण्याची संधी दिली,राज्याच्या सर्वोच्च सभागृहात पाठवले.

◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.३१ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : १.५० क्विंटल	२,६२१	२,६२१	२,६२१
ज्वारी/हायब्रिड : ३४.०० क्विंटल	२,२००	२,५६०	२,३५१
मूग : ५१.५० क्विंटल	६,३००	८,२६१	७,६९०
तूर : १.०० क्विंटल	८,५००	८,५००	८,५००
उडीद : ३२.०० क्विंटल	७,१००	८,११०	७,६८२
बाजरी:४.००क्विंटल	२,३७०	२,५९२	२,४८१
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: १५.०० क्विंटल	४,५००	४,५००	४,५००
हरभरा: ०.५० क्विंटल	६,४००	६,४००	६,४००

गरीबांच्या लालपरीची चाके थांबली

शासनाचे दुर्लक्ष: एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रवाशांचे हाल

बीड । प्रतिनिधी

ऐन गणेशोत्सवाच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाची हाक दिली आहे. त्यामुळे राज्यभरात गरीबांच्या लालपरीची चाके थांबली असून प्रवाशांचे मात्र अतोनात हाल झाले आहेत.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यात बुधवारी एसटी कर्मचाऱ्यांकडून बंद पाळण्यात आला. मुंबई, विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातील एसटी कर्मचारी या संपात सहभागी होते. त्यामुळे अपवाद वगळता गरीबांच्या लालपरीची चाके बुधवारी थांबली होती. त्यामुळे अनेक आगारात एसटी डेपोतच बस उभ्या आहेत. ऐन गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल होत आहेत. बीड जिल्ह्यातील सर्वच आगारातून एसटी बस धावल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक मार्गावर बस स्थानकात मोठी गर्दी होती. शेवटी प्रवाशांना खासगी वाहतूकीचा आधार घ्यावा लागला.

एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा – मुख्यमंत्री

एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले आहे. मागण्यांबाबत सकारात्कम तोडगा काढण्यता येईल असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

एसटी आंदोलनावर तोडगा काढावा – वडेट्टीवार

आम्ही सत्तेत असताना एसटी महामंडळाला १ हजार २०० कोटी रुपये दिले होते. मात्र सध्या केवळ आश्वासनांची खैरात दिली जाते असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला असून लवकर तोडगा काढावा असे ते म्हणाले.

चर्चा निष्फळ; आज मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर संप कशासाठी असा सवाल उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला. एसटी कर्मचारी संघटनांची कृती समिती आणि उदय सामंत यांच्यातील चर्चा निष्फळ ठरल्यानंतर उदय सामंतांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. एसटी कृती समितीची गुरुवारी सायंकाळी ७ वा. मुख्यमंत्र्यांसोबत सह्याद्रीवर बैठक असल्याची माहिती उदय सामंत यांची दिली.

एसटी कर्मचाऱ्यांच्या नेमक्या मागण्या काय?

एसटी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच आम्हाला वेतन द्यावं, अशा प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. २०१८ ते २०२४ पर्यंतच्या वाढीव महागाई भत्त्याची थकबाकी तसेच, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ मिळावी. ५८ महिन्यांच्या कालावधीची वार्षिक वेतनवाढीची थकबाकी व ५७ महिन्यांच्या कालावधीचा घरभाडे भत्त्याची थकबाकी मिळावी. खासगीकरण बंद करावे, सुधारीत जाचक शिस्त व आवेदन कार्यपद्धती रद्द करा. इनडोअर व आऊटडोअर मेडिकल कॅशलेस योजना लागू कराव्यात. सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळवण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करा. विद्यमान व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये वर्षभराचा मोफत पास द्या. चालक/ वाहक/कार्यशाळा व महीला कर्मचाऱ्यांना अद्यावत व सर्व सुखसोईचे विश्रांतीगृह द्या.

अग्रलेख

अतिवृष्टी पुन्हा मारक ठरण्याची शक्यता!

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मोसमातील पहिली अतिवृष्टी झाली. हिंगोली, बीड, परभणी, नांदेड, लातूर जिल्ह्यांत रविवारपासून जोरदार पाऊस होत आहे त्यामुळे अनेक शहरांतील जनजीवन विस्कळीत झाले असून सखल भागात पाणी भरले. सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल, असा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. गणेशोत्सव काळात देशात व राज्यात जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. या महिन्यात सरासरीहून अधिक पाऊस म्हणजे १०९ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा १६ टक्के अधिक पाऊस झाला. त्या पेक्षाही अधिक पाऊस सप्टेंबर महिन्यात होईल, असा अंदाज आहे. राज्यातील सर्वच भागात पाऊस होईल. कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी धरणात मोठ्या प्रमाणात पाणी येईल. त्यातून पाणी सोडल्यानंतर नांदेडपर्यंतचे बंधारे पाण्याने भरणार असून त्याचा फायदा शेतक–यांना होणार आहे. धाराशिवमध्येही पूरस्थिती उद्भवू शकते. सिद्धेश्वर, दुधना, येलदरी धरणे भरल्यामुळे नद्यांना पूर येतील. त्याचा सगळ्यात मोठा फायदा हा रोहिलागड या दुष्काळी भागाला होणार असून पाऊस न पडणा–या या भागातील तळी भरून जातील. मराठवाडा, विदर्भाला पावसाने जोरदार दणका दिला. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यात पावसाचा जोर नसला तरी नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांत शनिवारी मध्यरात्रीपासूनच जोरदार पाऊस झाला. परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांत मुसळधार पावसाने दाणादाण उडवली. नांदेड जिल्ह्यात २६ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. जिल्ह्यात २५ घरांची पडझड झाली तर १२ जनावरे दगावली. हिंगोलीत सखल भागाला तलावाचे स्वरूप आले, नदी–नाल्यांना पूर आला. परभणीत मासोळी, मुदगल धरणे तुडुंब भरली. पुरामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला. लातूर जिल्ह्यात एक तरुण शेतकरी वाहून गेला. जोरदार पाऊस कोसळत असल्याने नदी–नाल्यांना पूर आले, शेत–शिवारात पाणीच पाणी झाले. खरीप पिके पाण्यात बुडाली त्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. सध्या सोयाबीन बहरात आहे. छातीपर्यंत आलेली ही पिके शेंगांनी लगडली आहेत; परंतु आभाळ कोसळत असल्याने हाता–तोंडाशी आलेला घास हिसकावला जातो की काय, अशी बळीराजाची अवस्था बनली आहे. लातूर जिल्ह्यात शनिवारी रात्रीपासूनच पावसाचा जोर वाढला. रविवारी दिवसभर आणि रात्रीही पावसाचा जोर कायम राहिल्याने जनजीवन विस्कळीत झाले. जळकोट तालुक्यातील ढोर सांगवी येथील तरुण शेतकरी नदीत बैल धूत असताना पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेला. नांदेड जिल्ह्यात अनेक भागात पुराचे संकट असून खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भारतीय हवामान विभागाने यंदा व्यक्त केलेल्या पावसाच्या अंदाजानुसार एकूण सरासरी पाऊस होतो आहे. जून, जुलै आणि ऑगस्टमधील अपेक्षित पावसाची सरासरी झाली आहे. आता सप्टेंबर हा मान्सून पावसाचा एक महिना आहे. देशाच्या पाऊसमानाचा आढावा ३६ हवामान विभागाद्वारे घेतला जातो तसेच जिल्हा आणि प्रदेशनिहाय आढावादेखील घेतला जातो. त्यानुसार १३ हवामान विभागात अतिरिक्त पाऊस झाला आहे. १४ विभागात पावसाने सरासरी गाठली आहे आणि ९ विभागात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. महाराष्ट्रात कोकण किनारपट्टी, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ असे ४ हवामान विभाग आहेत. मराठवाडा वगळता इतर तिन्ही विभागांनी पावसाची सरासरी गाठली आहे. हवामान विभागाने यापुढेही अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. आकडेवारीनुसार यंदा देशात सरासरी उत्तम पाऊस होत असला तरी अनेक ठिकाणी अचानक वेळी–अवेळी झालेल्या जोरदार पावसाने महापुराच्या घटना घडल्या आहेत. हजारो–लाखो एकर शेतीमध्ये पाणी उभे राहिल्याने पिके कुजण्याची वेळ आली आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांत सर्व नद्यांना महापूर आल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शेतीचे सुमारे १२२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. जूनमध्ये प्रारंभी ओढ दिल्याने खरिपाच्या पेरण्या उशिरा झाल्या.आता सप्टेंबर महिन्यात अतिरिक्त पाऊस होईल, असा अंदाज वर्तविण्यात आल्याने रब्बी हंगामाच्या पेरण्या उशिरा होणार असे दिसते. अलीकडे खरीप आणि रब्बी हंगामात वेळी–अवेळी होणा–या पावसाचा शेतीला हमखास फटका बसतो आहे शिवाय ठराविक परिघातच जोरदार पावसाने महापूर येणे, भूस्खलन होणे, शहरात पाणी तुंबून राहण्याचे प्रकार वाढले आहेत. हवामान बदलामुळे असे प्रकार वाढत आहेत, असे म्हणून गप्प बसून चालणार नाही. येणा–या संकटांना तोंड देण्यासाठी तयार राहिले पाहिजे. माणसाचे मन चंचल आहे. करुणा भाकायला अन्? त्रागा करायला ते तयार असते. ये रे ये रे पावसा अशी करुणा भाकणा–या मनावर नको नको रे पावसा, अशी म्हणायची वेळ आली आहे.

पंकजा मुंडे यांचा पुणे जिल्ह्यात झंझावाती दौरा

निवडणूक जिंकण्यासाठी सकारात्मकतेने कामाला लागण्याचे केले आवाहन ; आज वडगाव शेरी, शिरूर मतदारसंघात जाणार

पुणे । प्रतिनिधी

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा आ. पंकजाताई मुंडे यांच्यावर भाजपने पुण्यातील पाच विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपवली आहे. त्या अनुषंगाने आजपासून त्यांनी या मतदारसंघाचा आढावा दौरा सुरू केला असून आज चिंचवड येथे मतदारसंघातील भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा आपणच जिंकणार आहोत, यात कसलेही दुमत नाही तथापि, सर्वांनी सकारात्मकतेने कामाला लागावे असं आवाहन त्यांनी केलं.

भाजपच्या विधानसभा प्रवास योजनेअंतर्गत चार दिवसांच्या दौऱ्यासाठी आ. पंकजाताईंचे दुपारी पुण्यात आगमन झाले. चिंचवड येथे आरंभ हॉल येथे बैठकीसाठी आगमन होताच त्यांचे जेसीबीतून पुष्पवृष्टी करत कार्यकर्त्यांनी वाजतगाजत जोरदार स्वागत केले. बैठकीच्या प्रारंभी आ. आश्विनी जगताप, पुणे शहर जिल्हाध्यक्ष शंकर जगताप यांनी त्यांचे स्वागत केले. माजी खासदार अमर साबळे, सदाशिव खाडे, महेश कुलकर्णी, माजी महापौर माईताई ढोरे, नामदेव डाके, अ‍ॅड. मोरेश्वर शेडगे आदी पदाधिकारी तसेच सुमारे दोनशे प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संघटन आणि विविध कार्यक्रमांविषयी कार्यकर्त्यांना त्यांनी बैठकीत मार्गदर्शन करून सूचना दिल्या. येणारी निवडणूक आपल्यासाठी खूप महत्वाची आहे. सरकारने 'लाडकी बहिण' व इतर महत्वाचे घेतलेले निर्णय लोकांपर्यंत पोहोचवावेत असे आवाहन त्यांनी केले. कार्यकर्त्यांनी देखील याप्रसंगी त्यांच्या भावना व्यक्त करून उत्स्फूर्त प्रतिसादात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान,उद्या ४ तारखेला आ. पंकजाताई वडगाव शेरी व शिरूरचा आढावा घेणार आहेत. चिंचवड येथे आज गाणपत्य सांप्रदायातील महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतले. तत्पूर्वी चिंतामणी गणरायाची विधिवत पूजाअर्चा त्यांनी केली तसेच आपल्या पुरातन संस्कृतीची साक्ष देणाऱ्या मंगलमूर्ती वाड्याला भेट दिली, याप्रसंगी चिंचवड देवस्थानच्या वतीने सन्मान स्विकारून त्यांच्याशी संवाद साधला.

मा.शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने फिरते विज्ञान प्रदर्शन उपक्रमाचा समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर व ग्रामीण परिसरातील ग्रामीण भागातील शाळांमधून गेल्या महिनाभरापासून चालू असलेल्या फिरते विज्ञान प्रदर्शन या उपक्रमाचा शनिवार दिनांक ३१ ऑगस्ट रोजी समारोप करण्यात आला. या प्रसंगी उपक्रमात सहभागी झालेल्या शिक्षकांचा व विज्ञान संवादकांचा माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी मा. नागनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या पूज्य बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या वतीने नेहरू विज्ञान केंद्र मुंबई यांचे फिरते विज्ञान प्रदर्शन हा उपक्रम गेले महिनाभर अंबाजोगाई शहर व तालुक्यातील ४५ शाळांमधे राबवण्यात आला. या उपक्रमात स्वच्छता व आरोग्याशी संबंधीत प्रदर्शनाचा परिसरातील १५००० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. दिनांक ३१ ऑगस्ट शनिवार रोजी या उपक्रमाच्या समारोपाचा कार्यक्रम योगेश्वरी संस्थेच्या गो.कुं.योगेश्वरी कन्या विद्यालय येथे रोजी घेण्यात आला. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिक्षणाधिकारी मा नागनाथ शिंदे यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सहसचिव भीमाशंकर शेटे यांनी या उपक्रमागील संस्थेची भुमिका मांडली. पपू बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या माध्यमातुन भविष्यातील विविध उपक्रमांची माहिती सांगितली. या उपक्रमात विज्ञान प्रयोग प्रशिक्षक म्हणून उत्साहाने काम करणारे होळेश्वर विदयालय होळ येथील विज्ञान संवादक आत्तम राठोड, संभाजीराव बडगीरे विद्यालय ममदापूर येथील श्रीमती पिनाटे मॅडम आणि योगेश्वरी संस्थेच्या विविध शाळांतील सर्व विज्ञान संवादकांचा शिक्षणाधिकारी साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या गाडी सोबत पुर्णवेळ काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. मा नागनाथ शिदे यांनी मार्गदर्शन करताना योगेश्वरी संस्थेने चालवलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून योगेश्वरी संस्थेच्या अशा विविध उपक्रमांसाठी प्रशासनाच्या पातळीवर आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर यांनी उपस्थित सर्वांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिनंदनपर भाषण केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, कार्यकारी उपाध्यक्ष अ‍ॅड जगदीश चौसाळकर, संचालक सदस्य रमण सोनवळकर, प्रा अभिजित लोहिया, मुख्याध्यापिका कुलकर्णी मॅडम, पाठक मॅडम यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व अनेक विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर मा.शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी योगेश्वरी संस्थेच्या म फुले वस्तीगृह येथे आवर्जुन भेट दिली.

सख्या बहिणीचा खुन केल्याप्रकरणी भावाला जन्मठेपेची शिक्षा

जालना । प्रतिनिधी

दिपक रामभाऊ पटेकर, वय ३८ वर्ष रा. आपेगाव ता. अंबड, हल्ली मुक्काम, सुंदर नगर, जालना या आरोपीस त्याची बहिण कमलाबाई शाहू कोल्हे यांचा खून केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.वी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व दहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष कारावास व कलमे २०१ भादनी मध्ये ३ वर्ष सत्रम करावास व पाच हजार रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने कारायसाची शिक्षा ठोठावली. घटनेची योडक्यात माहिती अशी की, मयत कमलाबाई तिची बहिण नंदा तसेच कमलाबाईचे भाउ सुधाकर पटेकर व आरोपी दिपक पटेकर यांची जमीन आपेगांव ता.अंबड येथे असून त्या जमीनीचा वाद अंबड न्यायालयात चालू होता. दि. ०८/०२/२०२१ रोजी अंबड न्यायालयात तारीख असल्यामुळे सर्वजण तारखेसाठी हजर होते. सध्यांकाळी पाय वाजता आरोपी दिपक याने बहिण कमलाबाई व इतर नातेवाईक यांना सुदंरनगर, चंदनझीरा येथे मुक्कामी थांबण्यासाठी विनंती केली. तेन्था सर्वजण चंदनझीरा येथे आरोपीच्या घरी आले. त्यावेळेस दिपक म्हणला नि व मयत कमलाबाई आम्ही बाहेर फिरूण येतो. त्यानंतर संध्याकाळी सहा वाजता आरापी दिपक व मयत कमलाबाई हे बाहेर फिरण्यासाठी गेले. व त्यानंतर आरोपी दिपक हा एकदा रात्री १२ ते ०९ च्या दरम्यान घरी आला. त्यावेळेस मयताची बहिण नंदा व मेव्हणे बालकिसन पठारे यांनी कमलाबाई कुठे आहे याची विचारपूस केली असता आरोपी दिपक येणे उडवाउडविले उत्तर दिले. दुस–या दिवशी नातेवाईकांनी कमलबाई हरवल्याची तक्रार दिली असता. आरोपी दिपक हा पोलीस स्टेशन मधून पळून गेल्यामुळे पोलीसांनी त्याला तत्काळ पकडले. दि.०९/०२/२०२१ रोजी मयताचे प्रेत मयूरा हटिलच्या पाठीमागे सापाडले. सदर प्रकरणी फिर्यादी मोतीराम सोनू बगाड, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन तालुका जालना यांच्या दि. १०/०२/२०२१ रोजीच्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन तालुका जालना येथे गुन्हा ५८/२०२१ कलम ३०२,२०१भादवी प्रमाणे गुन्हा दाखल होवुन संपुर्ण तपासाअंती मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात एकूण ०८ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी, पंच साथीदार, वैद्यकीय अधिकारी आर. जे. खान मॅडम, इतर साक्षीदार तसेच उपासीक अधिकारी पि.डी. सुपे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन तालुका जालना तसेच वाय.एम. बागुल, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन तालुका आलना यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. मा. ज्यामालयापुढे सरकारपक्षातर्फे आलेला साक्षीपुराना व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेवून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश ०३, जालना मा. श्री किशोर एम. जैस्वाल यांनी आरोपी दिपक रामभाड पटेकर, या आरोपीस त्याची बहिण कमलाबाई शानू कोल्हे यांचा खून केल्या प्रकरणी कलम ३०२ भा.द.जी. मध्ये जन्मठेपेची शिक्षा व दहा हजार रूपये दंड दंड न भरल्यास एक वर्ष साधा नाम व कलम २०१ भादवी मध्ये ३ वर्ष सश्रम करावास व पाच हजार रूपये दंड भरल्यास सहा महिने साधा काराणसाची शिक्षा जोतावली सरकारपक्षात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अ‍ॅड अशोक डी. मते ती काम पाहिले व कोर्ट पैरवी मिल्दा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचारी यांनी मदत केली.

मनोज जरांगे यांच्या विरोधात बॅनरबाजी

मराठा नेत्याने घेतला हा पवित्रा; उपोषणाचा दिला इशारा

बार्शी । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केले. त्याला वर्ष झाले. या एका वर्षात त्यांनी मुंबईवर पण चाल केली. वाशी येथे राज्य सरकारने त्यांची मोठी मागणी मान्य केली. पण आता मनोज जरांगे यांच्याविरोधात मराठा समाजातीलच एका नेत्याने चक्क उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. बार्शी शहरात या नेत्याने त्या स्वरुपाची बॅनरबाजी केली असल्याने मोठा चर्चेचा विषय बनला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य ढवळून काढले. त्यांच्या या आंदोलनाला राज्यात मोठा प्रतिसाद मिळाला. राज्य सरकारच्या पण नाकात त्यांनी दम आणला. या आंदोलनला आता एक वर्ष पूर्ण झाले आहे. वाशी येथे तर समाजाच्या अनेक मोठ्या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. पण एक वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाच्या हाती काय लागले, असा उद्वोग स्वतः जरांगे पाटील यांनी नुकताच अंतरवाली सराटी येथे केला होता. त्यानंतर त्यांनी राज्य सरकारला पुन्हा अल्टिमेटम दिला. त्यानंतर आपण उपोषणाला बसणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यातच आता खुद्द जरांगे पाटील यांच्याविरोधातच एका उपोषण होऊ घातले आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांना त्यांच्या जाहीरनाम्यात मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याबाबत आश्वासन देण्यासाठी सांगणार का? सोलापुरातील बार्शी तालुक्यातील मराठा समाज बांधवानी मनोज जरांगे पाटील यांना असा सवाल विचारला आहे. आठ दिवसात या प्रश्नांची उत्तरे न दिल्यास मनोज जरांगे पाटलांच्या विरोधात उपोषणाला बसणार अशी घोषणा करण्यात आली आहे. बार्शी तालुक्यातील मराठा नेते अण्णासाहेब शिंदे यांनी मनोज जरांगे पाटलांना सवाल केला आहे. देवेंद्र फडणवीस यांना हटवताना मराठा असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार पाडून आपण ब्राह्मण असलेल्या उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपदी बसवून मराठा समाजावर अन्याय करणार नाही का? पुढील आठ दिवसात माझ्या या प्रश्नांचे निरसन न केल्यास बार्शीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बसून आंदोलन करणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

किती जातींशी वैमनस्य घ्यायचे ते तरी सांगा?

महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर किती दिवसात मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणार हे त्यांच्याकडून लिहून घ्या. मनोज दादा यापूर्वी मराठा–मुस्लिम वाद, मराठा–दलित वाद आणि आता मराठा ओबीसी वाद सुरू आहे. त्यामुळे आणखी किती जातींशी वैमनस्य घ्यायचे ते सांगा, असा सवाल शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांना विचारला आहे.

२०२५ पर्यंत मिळणार पहिली 'मेक इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप

नवी दिल्ली । वृतसंस्था

स्वातंत्र्यानंतर नेहमी आयात करावी लागणारी सेमीकंडक्टर चिप आता भारतात तयार होणार आहे. देशात बनलेली पहिली सेमीकंडक्टर चिप २०२५ च्या मध्यापर्यंत येणार आहे, असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. मोदी मंत्रिमंडळाने कायन्स टेक्नोलॉजी इंडिया लिमिटेडचा रोज ६० लाख चिप बनवण्याचा पॅकेजिंग प्लँटला मंजुरी दिली. या प्लँटसाठी ३३०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. गुजरातमधील साणंद येथे हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत दोन अन्य चिममेकींग प्लॅन्ट येत आहे. कायन्सचा प्लॅन्ट ४६ एकर जमिनीवर उभारण्यात येणार आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, कायन्स टेक्नोलॉजी इंडिया लिमिटेड प्रकल्पाला मंजुरी दिली. या ठिकाणी ६.३ मिलियन सेमीकंडक्टर चिप रोज तयार होणार आहेत. हा प्रकल्प ४६ एकरात उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पात उत्पादन होणाऱ्या सेमीकंडक्टरचा मोठा वाटा कायन्स टेक्नोलॉजीलाच जाणार आहे. त्याची बुकींग यापूर्वीच झाली आहे. या प्रकल्पात तयार होणाऱ्या सेमीकंडक्टर चीपचा वापर विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. त्यात इंडस्ट्रियल, ऑटोमोटिव्ह, इलेक्ट्रिक वाहन, कंज्यूमर इलेक्ट्रॉनिक्स, टेलीकॉम, मोबाइल फोन यांचा समावेश आहे. सेमीकंडक्टर प्रकल्पाचे काम वेगाने सुरु आहे. या ठिकाणी उभारला जाणारा विशेष क्षेत्रात एकूण दीड लाख कोटींची गुंतवणूक येणार आहे. त्या सर्व प्रकल्पातून रोज सात कोटी सेमीकंडक्टर चिप तयार होतील. सेमीकंडक्टरला सिलिकॉन चिप असेही म्हणतात. कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उत्पादनात त्याचा वापर केला जातो. या चिपचा वापर केल्याशिवाय कोणतेही इलेक्ट्रॉनिक उत्पादन बनवता येत नाही. एलईडी बल्बपासून ते क्षेपणास्त्रपर्यंत आणि कारपासून ते मोबाइलपर्यंत, संगणकापासून लॅपटॉपपर्यंत सर्व गोष्टींमध्ये सेमीकंडक्टरचा वापर केला जातो. ही चिप इलेक्ट्रॉनिक वस्तूची मेमरी ऑपरेट करण्यासाठी कार्य करते. सेमीकंडक्टरचा वापर स्मार्ट घड्याळे, मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप, ड्रोन, एव्हिएशन सेक्टर आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातही केला जातो.

पान १वरून...

मराठवाड्यात अतिवृष्टीने लाखो

पाणी घुसल्याने पिकांचे नुकसान झालंय. नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. घरांची पडझड झाली आहे. बीड, नांदेड परभणी लातूर जिल्ह्यात मंगळवारी सायंकाळपासून पावसाचा जोर ओसरला. तत्पुर्वी सखल भागात पाणी हळूहळू शिरल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे. ढगफुटीसदृश्य झालेल्या पावसाने रौद्ररूप धारण केला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. मराठवाड्यात पावसाच्या कोसळधारांनी शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. ४ लाख ९६ हजार ३९२ हेक्टर जिरायत क्षेत्राचे नुकसान झाले असून ११ हजार ४९७ बागायत हेक्टर पावसानं नासलं आहे. सहा लाखांहून अधिक शेतकरी पावसाच्या पाण्यानं बाधित झाले आहेत. दोन दिवसाच्या पावसात १२ जणांचा मृत्यू झाला आहे. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १ जालना २ हिंगोली, बीड, लातूर जिल्ह्यात प्रत्येकी एक जण मृत झाला असून कालच्या पावसात ही आकडेवारी वाढून १२ वर गेली आहे.

धनंजय मुंडे पूरग्रस्त

उपस्थित होते. शहरातील नरहरी मंदिर , गंगासागर , खुदबेनगर ,इंदिरानगर ,रहिमत नगर ,मिलिंद नगर भिमानगर, बरकत नगर ,शाही फंक्शन हॉल, आंबेवेस परिसरास भेट देवून तेथील नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. नुकसानग्रस्त भागात प्रशासनाचे पथक सर्वे करीत आहे अशी माहिती उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी दिली. त्यानंतर धनंजय मुंडे हे परळी–अंबाजोगाई तालुक्यातील पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी रवाना झाले होते.

स्व.विनायक मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू'

नियमित सहभाग, विधिमंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन, विधिमंडळात उपस्थित करावयाच्या विषयांचे आकलन, उपस्थिती, विषय मांडताना वापरलेले ज्ञान, कौशल्य, निवडलेले मुद्दे, वक्तृत्व शैली, दर्जेदार उत्कृष्ट भाषणे या सर्व गोष्टी पडताळून पाहून पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीकडून या पुरस्काराची शिफारस केली होती. त्यानुसार राष्ट्रकूल संसदीय मंडळाकडून हा पुरस्कार जाहीर केला होता. शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय मा.आ. विनायकराव मेटे यांना 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाल्याने बीड जिल्ह्यासह सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. तीस वर्षांच्या सार्वजनिक जिवनात मराठा आरक्षण, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय शिवस्मारकासाठी रस्त्यावरची लढाई लढतानाच विधीमंडळातही आक्रमक आणि अभ्यासू मांडणी करणाऱ्या दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांना २०२० – २०२१ या वर्षाकरता महाराष्ट्र विधानपरिषद 'उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठा महासंघातून मराठा आरक्षण लढ्यात सामील झालेले दिवंगत मेटे २७ वर्षे विधान परिषदेचे सदस्य राहीले. सर्वाधिक वेळा विधान परिषद सदस्य म्हणून शपथ घेण्याचा त्यांचा विक्रम कायम आहे. मराठा आरक्षणाबरोबरच अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिवस्मारक, मुस्लिम आरक्षण, धनगर आरक्षण, शासकीय नोकर भरतीमधील वयाची अट, शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन, मराठा समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च व परदेशी शिक्षणाकरिता विद्या वेतन व मार्गदर्शनाकरिता सारथी या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेची संकल्पनाही मांडण्यातही त्यांचा पुढाकार होता.त्याद्वारे असंख्य विद्यार्थ्यांना लाभ मिळवून दिला. पोलीस भरतीतील उमेदवारांसाठी वयोमर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. या बाबतच्या मागण्यांसाठी आपल्या आक्रमक आणि अभ्यासू भाषणाने दिवंगत विनायकराव मेटे यांनी कायम विधीमंडळाचे सभागृह दणाणून सोडले. या मागण्यांसाठी त्यांनी रस्त्यावरचीही लढाई लढली. दरम्यान, १४ ऑगस्ट २०२२ रोजी मराठा आरक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बोलविलेल्या बैठकीला जाताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. परंतु, त्यांच्या कर्तृत्वाचा उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने त्यांच्या पश्चात्? सन्मान झाला त्यांच्या पत्नी शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

स्व. विनायकराव मेटे साहेबांनी समाजासाठी खूप काम केलं – मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे०

लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांना देखील आपण आज ''उत्कृष्ट संसदपटू'' पुरस्कार प्रदान केला आहे. त्यांच्या पत्नी डॉ. ज्योती मेटे ह्या या ठिकाणी पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये समाजासाठी खूप काम केलं परंतु दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत. त्यांची आठवण आपल्या सोबत आहे आणि त्यांनी केलेले काम कायम आहे.

मला मिळालेला उत्कृष्ट भाषण पुरस्कार

आजचा पुरस्कार हा मतदारसंघातील जनतेचा पुरस्कार आहे.आमदार म्हणून सभागृहात लोकांच्या न्यायासाठी,लोकांच्या मूलभूत सुविधांसाठी , शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आणि विकास कामांसाठी बोलता आले.लक्षवेधीच्या माध्यमातून विविध प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधून घेऊ शकलो.आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे आणि पाठबळामुळे हा पुरस्कार मिळाला असल्याचे आ.सोंळके यांनी सांगितले.

बलात्काऱ्यांना १० दिवसांत फाशी

त्यामुळे, आता राज्यपाल महोदयांच्या स्वाक्षरीनंतर राज्यात अँटी रेप कायदा लागू होईल. या अँटी रेप बिलास अपराजिता महिला व बाल विधेयक २०२४ असे नाव देण्यात आल आहे. राज्य सरकारने हे विधेयक मंजूर करण्यासाठी २ सप्टेंबरपासून दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवले होते. कायदामंत्री मलय घटक यांनी विधानसभेत हे विधेयक सादर केले. कोलकाता येथील आरजी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालायात ८ ऑगस्ट रोजी येथील एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर, देशभरातली डॉक्टर्स संघटना आणि जनतेने या घटनेवरुन तीव्र संताप व्यक्त करत आंदोलने केली. अनेक राजकीय पक्षांनीही महिला अत्याचाराच्या घटनांवर आवाज उठवत राज्यात कडक कायदा लागू करण्याची मागणी केली होती. बलात्काऱ्यांना तात्काळ फाशी देण्याची मागणी पीडित कुटुंब व महिला वर्गाकडून केली जात होती. पश्चिम बंगालमध्ये या घटनेचे तीव्र पडसात उमटले, तसेच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बलात्कार प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्याचा कायदा करावा, अशी मागणीही केली जात होती. या सर्व घटनांची दखल घेत पश्चिम बंगाल सरकारने बलात्कार विरोधी विधेयक सादर केले.

अपराजिता अँटी रेप विधेयकातील तरतुदी

नव्या कायद्यानुसार बलात्कार पीडित महिलेचा मृत्यू झाल्यास, किंवा ती कोमात गेल्यास आरोपीला १० दिवसांत फाशीची शिक्षा देण्यात येईल. बलात्कार आणि सामूहिक बलात्कार प्रकरणातील दोषींना पॅरोलशिवाय जन्मठेपेची शिक्षा देण्यात येणार आहे. बलात्कार प्रकरणातील गुन्ह्याचा तपास केवळ २१ दिवसांत पूर्ण करावा लागणार आहे, आवश्यकतेनुसार त्यास १५ दिवसांची वाढ देण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात अपराजिते टास्क फोर्स बनविण्यात येईल, ज्याचे नेतृत्व डीएसपी वर्गाचे अधिकारी करतील.

राज्यात शरद पवार तर बीड जिल्ह्याच्या

राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे प्रदेश अध्यक्ष महबूब शेख , जि प चे माजी सदस्य देविदास धस, अशोक हिंगे, गंगाधर आजबे, अमोल तरटे, राम खाडे, घनश्याम आण्णा शेलार , सागर आमले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माझी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्यासह भीमराव धोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भीमराव धोंडे यांनी माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्यासाठी कपड्याचा आहेर आणला. याप्रसंगी पुढे बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, माजी आमदार साहेबराव दरेकर हे सर्वसामान्य जनतेसाठी नेहमीच संघर्ष करत आले आहेत. वय जरी झालं तरी ते कधीही थकत नाहीत, तरुण कार्यकर्त्या सारखं ते पक्षासाठी काम करतात. त्यामुळे देशात आणि राज्यात शरद पवार तर बीड जिल्ह्यामध्ये साहेबराव दरेकर हे वय जरी झाल असल तरी राजकारणामध्ये तरुण आहेत, असे सांगितले.

यावेळी बोलताना साहेबराव दरेकर म्हणाले, माझे आयुष्य सर्वसामान्य जनतेसाठी दिले आहे. आमदार असताना आष्टी मतदार संघासाठी खूप काम केले. यापुढेही सर्वसामान्य जनतेसाठी कायम तत्पर असणार आहे. पवार साहेब हे आमच्यासाठी आदर्शवत असून त्यांच्याकडे पाहून आम्ही न थकता पक्षासाठी काम करतो, सर्वसामान्य जनतेची कामे करतो. यापुढे सुद्धा आम्ही जनतेसाठी आमचे आयुष्य देणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी किशोर हंबर्डे, अण्णासाहेब चौधरी, अमोल तरटे, कुंडलिक दरेकर , बबन झांबरे, डॉ. मधुकर हंबर्डे, सुकलाल मुथा, संजय साठे ,गणेश कवडे, डॉ, बाळासाहेब नांगरे ,अँड हनुमंत थोरवे, बाळासाहेब मिसाळ, गणेश कवडे नगरसेवक नगर, राहुल काकडे, बाळासाहेब नागरगोजे,राष्ट्रवादीचे पाटोदा तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव, रंगनाथ खेडके विष्णुपंत घोलप, अँड प्रदीप चव्हाण, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रवींद्र ढोबळे, आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप, सुनील नाथ,संपत मस्के, बाळासाहेब गुंजाळ, संदीप खाकाळ, चिंचोंडीचे सरपंच शरद पवार, संदेश कारले , बाळासाहेब हराळ, राजेंद्र गुंड,काकासाहेब तापकिर ,महेश हंबर्डे, राजेंद्र भराटे, संजय गाडे, बबन महाराज बहीरवाल, ह भ प आजिनाथ आंधळे, राजाभाऊ भोसले, बबन शिंदे, बापूराव नाईकनवरे, शेख नसीर, रिजवान शेख, लहू ढोले, राजाभाऊ घोलप, बाळासाहेब निकम,लक्ष्मण नन्नवरे, रमेश ढोबळे अभियंता, अविनाश भवर, भगवानराव बेरड, माजी सरपंच सुनील सूर्यवंशी,सुरेश दरेकर, जयंतराव नलावडे आबासाहेब पाटील, विजय गाढवे,गो.गो.मिसाळ, मनोज गाढवे, राजाभाऊ कर्डिले, संभाजी कर्डिले, अँड ताहेर,लईक काझी,केशव सूर्यवंशी, डॉ. संतोष गीते, आधी सर आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मोफत आरोग्य तपासणी करून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ५४७ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल जगताप यांनी केले तर उपस्थित त्यांचे आभार जि प सदस्य उद्धव दरेकर यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर दरेकर,ऋषिकेश दरेकर,एस दरेकर , केशव चव्हाण,भरत घोडके, भाऊ शितोळे, शरद सरोदे, सागर चौधरी मधुकर सायबर, आदिनाथ पडोळे, बाबू चव्हाण, शैलेश वांढरे, संतोष वाडेकर,शिवाजी आनपट,सुभाष वाळके, सिद्धेश्वर शेंडगे,अमोल लगड, संदीप शेंडगे,यांनी परिश्रम घेतले.

टी.सी. हरवला आहे.

विशाल दादासाहेब जाधव या विद्यार्थाचा बारावी पासचा टी.सी. गेवराई ते बीड एसटी प्रवासा दरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास संपर्क करा.

::: संपर्क :::

विशाल दादासाहेब जाधव, मो.९०२२२९४१६९

सांगवी पाटण येथे बैल पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा

म्हसोबावाडी : आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे बैल पोळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला, पोळा सण म्हणजे शेतकऱ्याला वर्षभर साथ देणाऱ्या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. शेतकऱ्यांच्या दृष्टीनं हा सण महत्त्वाचा असतो.ग्रामीण संस्कृतीत पोळ्याच्या दिवशी बैलांचं पूजन केलं जातं. बैलांचा साजशृंगार करत त्यांना पुरणपोळी खाऊ घातली जाते. गावातल्या मिरवणुकीत बैलांना फिरवलं जातं.आजही ही परंपरा उत्साहात जपली जात आहे.सर्जा-राजाचा गौरव केला जाणारा बैलपोळा हा कृषिप्रधान संस्कृतीतील उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जाणारा महत्त्वाचा सण आहे.शेतीत काबाडकष्ट करत बळीराजाला सुखी आणि समृद्ध करणाऱ्या, मेहनतीचे खरे प्रतीक आहे.तसेच यंदा वेळेवर जास्त पाऊस पडल्यामुळे उन्हाळ्यामध्ये पाणी राहणार आहे,परंतु जास्त पाऊस पडल्यामुळे पिंकाचे भरपुर प्रमाणावर नुकसान झाले आहे, शेतकऱ्यांमध्ये कभी खुशी, कभी गम अशी गत झाली आहे,सांगवी पाटण गावामध्ये यावर्षी ४ कठाळे सोडण्यात आले, आरती झाल्यानंतर गावात बैलाची मिरवणूक काढण्यात आली,यावेळी सरपंच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावातील ग्रामस्थ व शेतकरी वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते..

दैनिक
राज्य
लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ४ सप्टेंबर २०२४

अण्णाभाऊंनी कष्टकऱ्यांच्या घामावर, समाजातील विषमतेवर लेखन केले : प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जातकेंद्री व्यवस्था उध्वस्त करावी आणि माणूसकेंद्री व्यवस्था निर्माण व्हावी, या उद्देशाने अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य लिहिलेले आहे. अठरापगड जातींची माणसं अण्णाभाऊंना आपली वाटत होती. अण्णाभाऊंनी कष्टकऱ्यांच्या घामावर, समाजातील विषमतेवर लेखन केले आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी केले.

'जोशाबा' पुरुष बचत गटाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त अंबाजोगाई येथील विलासराव देशमुख सभागृहात दिनांक ३१ ऑगस्ट रोजी व्याख्यानाचे आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य राजकुमार मस्के (उदगीर) बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुळशीराम जोगदंड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. दयाराम मस्के यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करुन व महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करून करण्यात आली.

कार्यक्रमात आपल्या विस्तारीत भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. राजाराम मस्के म्हणाले की, इतिहासाचे वाचन नीट असले पाहिजे, इतिहासाचा आंधळा अभिमान, अज्ञाताचा भागामुळे स्वत:चे तर नुकसान होते पण चळवळी देखील संपल्या जातात. दुसऱ्यासाठी जगण्याचा विचार हा अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात आहे. या गोष्टींकडे पाहताना आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्याकडे पहावे लागणार आहे. हल्ली खूप असे झाले आहे की, ज्ञानाची प्रगती खूप झाली आहे. नेट, सेट, पीएच. डी. डॉक्टर, इंजिनिअर खूप झाले आहेत. पण माणसाची प्रगती मात्र शून्य होत चालली आहे. ज्ञानामुळे मान मिळतो हे खरे आहे, पण ज्ञानाला प्रगतीची जोड मिळाली नाही तर ज्ञान वांझोट होत हे आपण लक्षात ठेवावं, असे प्राचार्य मस्के म्हणाले. पुढे प्राचार्य मस्के म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखनीला अर्पण केली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी काळजाला हलवणारी आणि आकाशात झेप घेण्यासाठी बळ देणारी कथा, कादंबरी लिहिली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी रुढीवर भंजन करणारे साहित्य लिहिले आहे. विषमतेबद्दलचा प्रशोप आणि प्रक्षोभपणा अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात वाचायला मिळतो. अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यातून विद्रोह मांडला आहे, त्याचे वाचन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. सध्या इमारतींची उंची वाढली पण माणसांची उंची कमी झाल्याचे आपल्या पहायला मिळते आहे. त्या चार मजल्यांच्या इमारती काय कामाच्या ज्यात माणूसकी नाही, नातेसंबंध नाही, ओलावा नाही. म्हणून एक लक्षात ठेवा शहाणपण आले पाहिजे. अंगात महागडा कोट, हातात अंगठ्या पण जगणे जर दळभदरी असेल तर या गोष्टींचा काय उपयोग ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रमांनी 'जोशाबा' पुरुष बचत गटाच्या वतीने साजरी

अण्णाभाऊ यांनी साहित्यात लिहिलेल्या पात्रांचा विचार केला तर त्यांची पात्रे कमी शिकलेली आहेत पण प्रज्ञावान, प्रबुद्ध आहेत. अस्पृश्यतेच्या नरकाला अण्णाभाऊ यांनी आग लावली आहे हे आपण विसरता कामा नये. कशासाठी लिहावं, कशावर लिहावं याचही भान अण्णाभाऊ साठे यांनी लेखकांना दिले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात लिहिले आहे. जग बदल घालून घाव, सांगून गेले मला भिमराव. या गुलामगिरीच्या चिखलातून आपल्याला सर्वांना बाहेर काढायचे आहे आणि ते गीत आता आपल्याला गात रहायचं आहे. ते गीत फक्त ओठात नव्हे पोटात उतरायचे आहे, असेही प्राचार्य मस्के म्हणाले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्राचार्य मस्के यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कांदंबरीचे आणि त्यांच्यातील पात्रांचे दाखले दिले.

यावेळी बोलताना प्रा. दयाराम मस्के म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या त्रिसुत्राच्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा यातील पहिल्या अक्षरामुळेच आम्हाला बळ मिळाले आणि एवढ्या पदव्या हस्तगत करण्यात आल्या. ही बाबासाहेबांची किमया आणि पुण्याई आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या माणसानं जगलेली व्यथा साहित्यातून मांडली आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील अनेक पात्र उलगडून सांगितली आणि आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबद्दल उपस्थितांना सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप तुळशीराम जोगदंड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबुराव जोगदड यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. संदीपान हजारे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. गादेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. रमेश सरवदे आणि बळीराम उपाडे यांनी प्रबोधनात्मक गीते सादर केली. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, झाड देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी 'जोशाबा' पुरुष बचत गटाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान ६ वरून...

अतिवृष्टीमुळे झालेल्या

पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना त्याची सरसकट भरपाई तात्काळ द्यावी, अशी मागणी करून जिल्हाध्यक्ष देशमुख म्हणाले की, रविवार रोजी रात्री पासूनच सुरू झालेला पाऊस हा रविवार व सोमवार असा सलग दोन दिवस कोसळला. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ६१ महसूल मंडळात प्रचंड वृष्टी झाली आहे. जिल्ह्यातील ४ महसूल मंडळात १५० मि.मी. तर ३१ महसूल मंडळात १०० मि.मी. पेक्षा ही अधिक पाऊस झाला आहे. या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांसह फळबागा तसेच काढणीला आलेल्या पिकांचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले आहे. असंख्य शेतकर्यांचा ऊस शेतातच आडवा झाला आहे. या अस्मानी संकटामुळे खरिपाबरोबरच, रब्बीच पीक नियोजनावर निसर्गाने पूर्णपणे वरवंटा फिरवला आहे. खरीप पिके आज पूर्णपणे पाण्यात सडून चालली आहेत. गोदाकाठ, नदी काठावरील परिसरात अनेक ठिकाणी ओढ्या नाल्यांना पूर आले आहेत. शहरांसह ग्रामीण भागातील अनेक घरांच्या पडझडी होऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे याबाबत बीडचे जिल्हाधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, महसूल मंडळातील अधिकारी, कृषि विभाग व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा हाताळणार्या अधिकारी वर्गाने सदर नुकसानीची तात्काळ पाहणी करून शासनाने तातडीने बीड जिल्ह्यातील शेतकर्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू करून त्याची सरसकट भरपाई तात्काळ शेतकर्यांच्या खात्यावर थेट वर्ग करावी तसेच अतिवृष्टीमुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक रस्त्यांची, पुलांची वाट लागली आहे. तेव्हा शासनाने रस्ता व पुल दुरूस्तीकडेही विशेष लक्ष पुरवावे व त्यांच्या दुरूस्तीसाठी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, असेही आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केले आहे.

संततधार पावसामुळे खरीप

पाऊस सकाळीही जोरातच होता दिवसभर पावसाची हजेरी होती पावसाने उघडीप न दिल्याने सूर्यदर्शन झाले नाही त्यामुळे दुपारपर्यंत जयवंती,वाणा या सह इतर तलाव ओढे तुडूंब भरले होते अंबाजोगाई,केज सह इतर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग मांजरा धरणात होत आहे

तालुक्यातील ग्रामीण भागातील वाहतूक बंद होण्याच्या मार्गावर आहे शहराच्या अनेक भागातील रस्त्यावर,वस्ती भागात पाणी झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले तालुक्यात अनेक छोट्यामोठ्या नद्यांना पूर आला असून शहरासह परिसरातअनेक ठिकाणी वाहने थांबलेली दिसून आली दिवसभर धो धो पाऊस सुरू असल्यामुळे झाल्याने सोयाबीन,मुग, उडीद या पिकांना मोठा फटका बसला असून सखल भागांमध्ये पाणी साचल्याने बऱ्याच शेतातील सोयाबीन पिके बुडून गेल्याचे दिसून आले तर अति मुसळधार पावसाचा इशारा दिल्यामुळे पुढील काही दिवस पाऊस पडणार असल्याचे हवामान विभागाच्या वतीने सूचना केली जात आहे मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसाने अंबाजोगाई व परिसरात पिकांचे नुकसान झाल्याने विमा कंपनी, महसूल आणि कृषी विभागाने एकत्र पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत भरघोस मदतीचा हात द्यावा अशी शेतकऱ्यातून मागणी होत आहे.

एसटी कामगार संपावर

आगारातील एसटी चालक वाहक व इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतल्यामुळे दारू आगारातून जाणाऱ्या अनेक बस फेऱ्या रद्द कराव्या लागल्या त्यामुळे प्रवाशांना खाजगी वाहतुकीने प्रवास करावा लागला लांब पल्याच्या बस रद्द झाल्यामुळे प्रवाशांची तारांबळ उडाली. सर्व मागण्या मान्य होईपर्यंत हा संप चालूच राहणार असल्याचे कामगारांनी सांगितले या संघामध्ये धारूर आगारातील कर्मचारी मोठ्या संख्येने संपामध्ये सहभागी झाले होते.

महायुतीत आजबे, धस, धोंडे

मतदार संघाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. १९८०, १९८५ आणि १९९० असे सलग तीनवेळा आमदार राहीलेले धोंडे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत देखील भाजपकडून विधानसभेत पोचले. तर, सुरेश धस देखील या मतदारसंघातून १९९९, २००४ व २००९ असे सलग तीनवेळा या मतदारसंघातून विजयी झाले.

विशेष म्हणजे धसांची विधीमंडळ कारकीर्द आपले राजकीय गुरु असलेल्या साहेबराव दरेकर यांच्या पराभवानेच सुरु झाली. सुरेश धस व भीमराव धोंडे या दोघांनी देखील एकमेकांना पराभूत केलेले आहे. दरम्यान, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर सुरेश धस २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपसोबत आले. २०१८ सालची लातूर धाराशिव - बीड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत त्यांनी विजय मिळविला. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या डॉ. प्रीतम मुंडे यांना या मतदारसंघातून ६९ हजारांचे मताधिक्क्य मिळाले. पण, पुढे पाचच महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवारीवर बाळासाहेब आजबे यांनी केला.

सय्यद गुरुजी साहित्य

महाविद्यालय सचिव आणि माजी सभापती,पंचायत समिती आष्टी,विजयकुमार बांदल अण्णा यांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई या नाटकात दत्तक पुत्राची भूमिका केली होती.बीड जिल्ह्याचे खासदार तथा क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा परिषद शाळेच्या इमारत उद्घाटन कार्यक्रमासाठी यावेत,याचा पुढाकार घेणारांपैकी ते एक होते.क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालनही सय्यद गुरुजी त्यांनी केले होते.सन १९८० साली त्यांनी या जगाचा निरोप घेतला.पुस्तके भेट देण्याचा उपक्रम दरवर्षी ५ सप्टेंबर अर्थात शिक्षक दिनाच्या निमित्ताने राबविला जाणार आहे.असे सय्यद गुरुजी त्यांचे चिरंजीव प्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

माजलगावात सद्गुरू रामानंद महाराजांच्या पुण्यतिथीनिमीत्त शताब्दी महोत्सव

माजलगाव । प्रतिनिधी

श्री. समर्थ सद्गुरू रामानंद महाराजांच्या शंभराव्या पुण्यतिथीनिमीत्त शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन राजस्थानी सेवा मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि. १८ ते २५ सप्टेंबर दरम्यान करण्यात आले असल्याची माहिति रामानंद मठ संस्थानचे मठाधिपती तथा संयोजक ह.भ.प. ज्ञानेश्वर माउली महाराज माजलगावकर यांनी दिली आहे.

दिपप्रज्वलन माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार असुन विनापूजन ह.भ.प. भागवानबाबा पात्रुडकर यांच्या हस्ते होणार आहे. या हरिनाम सप्ताहात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तथा श्रीमद्? भागवत ज्ञानयज्ञ सोहळा होणार असुन कथा प्रवक्ते वे.शा.सं.भागवताचार्य अनिल महाराज हे असुन ज्ञानेश्वरी व्यासपिठ चालक ह.भ.प. परमेश्वर महाराज कुरे हे आहेत. किर्तनविणा प्रमुख ह.भ.प. सुभाष महाराज होगे हे आहेत. मृदंगवादक म्हणुन मृदंगमहर्षी भरत पठाडे, मृदंगअलंकार शत्रुघ्न पठाडे, मृदंगविशारद ज्ञानेश्वर माउली जाधव हे असणार आहेत. दि. १८ बुधवारी पहिल्या दिवशी ह.भ.प. भागवताचार्य तुकारामशास्त्री मुंडे यांचे किर्तन तर ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी, ह.भ.प.प्रकाश महाराज साठे, ह.भ.प.सगुणउपासक अनिल पाटील, ह.भ.प. एकनाथ महाराज माने, ह.भ.प. अर्जुनशास्त्री लाड, सुनिल महाराज झांबरे यांचे तर दि. २५ बुधवारी धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज बीड यांचे काल्याचे किर्तन होईल. यानंतर अभय राजाभाउ होके पाटील यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन रामानंद मठ संस्थानचे मठाधिपती तथा संयोजक ह.भ.प. ज्ञानेश्वर माउली महाराज माजलगावकर यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी शरीरसाधना केली तरच देशाचे भविष्य उज्ज्वल -डॉ गजानन होन्ना

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १९वर्षाखालील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत.

गोळाफेक -१)वैभव खांडगे २)शुभम घडसे थाळीफेक १)प्रताप खोडवे २)शुभम घडसे हॅमर थ्रो १)वैभव खांडगे आठशे मीटर धावणे १)पवन हरदास -द्वितीय पंधराशे मीटर धावणे १)प्रवीण राठोड - तृतीय मुलींमधून हॅमर थ्रो स्पर्धेत १) अमृता नागरगोजे -प्रथम शंभर मी. धावणे १)मेहर शिंदे - द्वितीय उंच उडी १)अमृता नागरगोजे -द्वितीय या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रा. दिनेश गडदे व डॉ उमेश साडेगावकर यांनी केले. भारत माता सभागृहात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, प्रा. अंकुश साबळे, नूतन पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गजानन होन्ना म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या काळात अभ्यासासोबत आरोग्य सुधारणे महत्वाचे आहे कारण तरुणांनी शरीर सुधारले तरच राष्ट्राची प्रगती होईल असे ते म्हणाले. नूतन पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री यांचेही या प्रसंगी पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.या सर्व यशस्वी खेळाडूंचे भा शि प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, केंद्रीय कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, ॲड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख अभय कोकड, प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या आहेत.

संततधार पावसाने माजलगाव धरण मृतसाठ्यातून बाहेर ; पाण्याची टक्केवारी २०.१९ पर्यंत वाढली

ज्योतिराम पांढरपोटे । माजलगाव

परवापर्यंत पावसाचा शेवटचा टप्पा आला तरी माजलगाव धरण मृत साठ्यातच होते. त्यामुळे भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नाची माजलगावकरांना मोठी चिंता लागून होती.परंतु दि ०१ सप्टेंबर रविवार रोजी धरण परिक्षेत्रात झालेल्या सततधार पावसामुळे जायकवाडीतून सुरू असलेल्या पाण्याची आवकमुळे माजलगाव धरण एकाच दिवसात मृत साठ्यातून उपयुक्त साठ्यात २०.१९% टक्केवर आले आहे. दरम्यान पाण्याची आवक ७३५७ क्युसेकने सुरूच असून बीड,माजलगाव शहरासह १८ खेडी पाणीपुरवठ्याच्या भेडसावणारा पाणी प्रश्न मिटवणार आहे ही सुखद बाब आहे.

बीड माजलगाव शहराची ताहान भागवणारे माजलगाव धरण पावसाळा संपत आला तरी कोरडे ठाकच होते. धुंवाधार नक्षत्र असणाऱ्या मौसमी पावसातल्या ऑगस्ट अखेर धरणाची पाणी पातळी ही मृत साठ्यातच होती. माजलगावकरांसाठी मोठी चिंतेची बाब होती. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह,जनावरे , शेतीला लागणाऱ्या पाण्याची मोठी समस्या उभी राहणार होती.परंतु दि १ सप्टेंबर रविवार रोजी वरुण राजाने राज्यात खास करून मराठवाड्यात धुवाधार बॅटिंग करण्यास सुरुवात केली.धरण परिक्षेत्रात सततधार पडणाऱ्या पावसामुळे व जायकवाडीतून सुरू असलेल्या फ्लोमुळे माजलगाव धरण एकाच दिवसात मृतसाठ्यातून उपयुक्त साठ्यात आले आहे.दरम्यान दि ०३ सप्टेंबर मंगळवार रोजी दुपारी १२:०० वाजण्याच्या सुमारास माजलगाव धरणाची पाणी पातळी २०.१९ टक्क्यावर पोहोचली आहे.तर धरणात येणारी पाण्याची आवक ७,३५७ क्युसेकने सुरु आहे.त्यामुळे माजलगावकरांसाठी ही सुखद बाब म्हणावी लागेल.

धरणात पाण्याची आवक ७३५७ क्युसेकने सुरूच

मोरेश्वर मंदिर पाण्याखाली. अनेक गावांचा संपर्क तुटला.

दि १ सप्टेंबर रविवार रोजी झालेल्या सततधार पावसामुळे गोदावरी नदीला पूर आला आहे.माजलगाव तालुक्यातील गंगामसला येथे असलेले प्रसिद्ध नवसाला पावणारे मोरेश्वर मंदिर पाण्याखाली आले आहे.तर सुरुमगाव,गुंजथडी,सोन्नाथडी,शुक्ल तिर्थ लीमगाव,मोगरा, डिग्रस,डाकेपिंपरी, खातगव्हाण, शिंदेवाडी गावचे पुल वाहुन गेल्यामुळे तर काही फुलांवर पाणी असल्यामुळे वरील गावांचा संपर्कही तुटला आहे. दरम्यान प्रशासनाकडून गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

माजलगाव धरणाची

दि ०३ सप्टेंबर मंगळवार रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंतची स्थिती

१)धरणाची एकुण पाणीपातळी -४२७.७०मी/४३१.८० मी.
२) धरणातील एकूण पाणीसाठा -२०५.० ३/४५४ ३.
३)उपयुक्त पाणीसाठा:- ६३.०० ३/३१२.०० ३
४) धरणाची टक्केवारी- २०.१९ %
५) धरणात येणारी पाण्याची आवक:-७३५७.०० क्युसेक

भर पावसात प्रा.टी.पी.मुंडे यांचा शहरात पाहणी दौरा; अधिकाऱ्यांना केल्या योग्य त्या सूचना!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

ओबीसी बहुजन पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा.टी.पी.मुंडे सरांनी आज सकाळी झालेल्या भर पावसात परळी शहरातील विविध भागात पाहणी दौरा केला या दौऱ्या दरम्यान तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार बी. एल. रुपनर तसेच नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्या. तसेच नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नागरिकांना उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉक्टरच्या टीम कडून आरोग्य विषयक सुविधा, रेशन दुकानांमार्फत अन्नधान्यांची व्यवस्था आणि पाहणी केलेल्या नागरिकांना अन्नधान्याची मोफत व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

गेल्या तीन दिवसापासून बीड जिल्ह्यासह परळी शहरात मुसळधार पाऊस पडत आहे. नदी नाल्या तुडुंब भरून वाहत आहेत. पावसाच्या पुराच्या पाण्यामुळे शहरातील बरकत नगर, इंदिरानगर, रहमत नगर, गंगासागर नगर, भुई गल्ली, मोमीनपुरा ,मिलिंद नगर, आझाद नगर, मलिक पुरा,कुरेशी नगर, आंबेवेस, फुकटपुरा आदी भागात भेट देऊन पाहणी केली. भर पावसात भिजून त्यांनी नागरिकांच्या घरांची पाहणी केली या भागामध्ये पाणी नागरिकांच्या घरामध्ये शिरले आहे. सरस्वती नदीचे पाणी सर्वत्र शहरात शिरले आहे. त्यामुळे शहरातील गल्यांमध्ये , मोहल्यामध्ये पाणी शिरून घरांची पडझड झाली आहे. पाणी शिरल्याने आवश्यक त्या संसार उपयोगी वस्तूचे नुकसान झाले असून अन्नधान्य खराब झाले आहे. नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरले आहे. सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी पाहणी दौरा केला. त्यांनी तहसील तसेच नगरपालिकेचे अधिकारी यांना प्रत्यक्ष पाहणी स्थळावर बोलावून घेतले आणि पंचनामे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या तसेच नागरिकांनी स्वत:ची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले तसेच आरोग्याची काळजी म्हणून परळी उपजिल्हा रुग्णालयाची डॉक्टरांची टीम व औषध गोळ्यांची व्यवस्था करावी अशा सूचना प्रशासकीय यंत्रणेला देण्यात आल्या. तसेच पाहणी केलेल्या ठिकाणी नागरिकांना सुरक्षित स्थळी हालवून त्यांना रेशन दुकानामार्फत त्यांच्या अन्नधान्याची व्यवस्था करावी अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

या पाहणी दौऱ्यामध्ये उपजिल्हाधिकारी लाटकर साहेब, परळी तहसीलचे नायब तहसीलदार बी.एल. रुपनर साहेब, नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, ओबीसी बहुजन पार्टीचे मराठवाडा अध्यक्ष भीमराव मुंडे, परळी मार्केट कमिटीचे माजी उपसभापती प्रा.विजय मुंडे, नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य प्रदीप भैय्या उर्फ बबलू शेठ मुंडे, शेख इलियास, जम्मू सेठ,बबलू सय्यद, नागेश व्हावले, शेख बाबा, सय्यद यासीन, जाहेद भाई, शेरू भाई, फारुख भाई, मनियार खाला, चांद भाई, मुक्तार भाई, जब्बार भाई, जुबेर भाई, शेख सिकंदर, सय्यद राजाभाई, महमूद भाई आदी उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४
४

नैसर्गिक शेतीसाठी एमएसपी जाहीर करणारे हिमाचल बनले पहिले राज्य!

पुणे : नैसर्गिक शेती उत्पादनांसाठी किमान आधारभूत किंमत लागू करणारे हिमाचल प्रदेश हे भारतातील पहिले राज्य बनले आहे. हिम उन्नती योजनेंतर्गत ५०,००० शेतकऱ्यांना रासायनिक मुक्त शेती उपक्रमात सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट या राज्याने ठेवले आहे.

नैसर्गिक शेती उत्पादनांसाठी किमान आधारभूत किंमत प्रदान करणारे भारतातील पहिले राज्य बनून हिमाचल प्रदेशने इतिहास रचला आहे. ही महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी फ्रेंच नॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर ॲग्रिकल्चर, फूड अँड एन्व्हायर्नमेंटच्या शिष्टमंडळासोबतच्या बैठकीत नुकतीच केली.

मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या या बैठकीला चार शास्त्रज्ञ उपस्थित होते. ज्यात लिसीसचे उपसंचालक प्रा. ॲलिसन मेरी लोकोंटो आणि संशोधक प्रा. मिरेली मॅट, डॉ. एव्हलिन ल्होस्टे आणि डॉ. रेनी व्हॅन डिस यांचा समावेश होता. शिष्टमंडळाचा हिमाचल प्रदेशचा दौरा हा राज्याच्या नैसर्गिक शेतीतील प्रगतीचा शोध घेण्यासाठी तीन आठवड्यांच्या मोहिमेचा एक भाग आहे. मुख्यमंत्री सुखू यांनी खुलासा केला की राज्याने विविध नैसर्गिक शेती उत्पादनांसाठी एमएसपी दर ठरविले आहेत. त्यानुसार गव्हाची किंमत रु. ४० प्रति किलो आणि मका रु. ३० प्रति किलो. याशिवाय गाईच्या दुधाला ४५ रुपये प्रतिलिटर, तर म्हशीच्या दुधाला रु. ५५ प्रति लिटर असा भाव ठरविला आहे. मुख्यमंत्री सुखू यांनी नैसर्गिक शेतीमध्ये हिमाचल प्रदेशची अग्रगण्य भूमिका अधोरेखित केली आणि पुढील पाच ते सहा वर्षांत राज्य या क्षेत्रात अग्रेसर होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकी दरम्यान, सुखू यांनी नैसर्गिक शेती उत्पादनांची वाजवी किंमत आणि सत्यता सुनिश्चित करण्यासाठी डिझाइन केलेली प्रमाणन प्रणाली देखील सादर केली. हा उपक्रम राज्याच्या व्यापक हिम-उन्नती योजनेचा एक भाग आहे, जो क्लस्टर-आधारित दृष्टिकोनावर चालतो. या योजनेचे उद्दिष्ट रसायनमुक्त उत्पादन प्रमाणित करण्याचे आहे आणि २,६०० कृषी गटांद्वारे अंदाजे ५०,००० शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याची योजना आहे. याव्यतिरिक्त, राज्य दुग्धव्यवसाय क्षेत्र वाढवण्यावर आणि दूध उत्पादन वाढवण्यावर भर देत आहे. भेट देणाऱ्या शास्त्रज्ञांनी नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी हिमाचल प्रदेशच्या प्रयत्नांची प्रशंसा केली आणि प्रमाणन प्रणालीमध्ये स्वारस्य व्यक्त केले आणि इतर देशांमध्ये संभाव्य पद्धती लागू करण्यावर प्रकाश टाकला. या बैठकीला शिक्षण मंत्री रोहित, मुख्य संसदीय सचिव संजय अवस्थी आणि इतर स्थानिक मान्यवरांसह अनेक उल्लेखनीय व्यक्ती उपस्थित होते.

लेमन ग्रासच्या शेतीतून मिळतो मोठा नफा

सध्याच्या काळात शेतकरी विविध प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन पिकांचे प्रयोग करताना दिसत आहेत. ज्यातून त्यांना चांगला नफाही मिळतो आहे. असेच एक पीक म्हणजे लेमन ग्रास होय. याचा वापर बहुतांशी कॉस्मेटिक, डिटर्जंट, आणि औषधांमध्ये केला जातो. कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या या पिकाला सध्या चांगली मागणी आहे.

औषधी वनस्पती असल्याने याचे बरेच उपयोग आहेत. योग्य तंत्राचा वापर करून या पिकाची लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो. तसेच यासाठी लागणारी गुंतवणूकही कमी असते. याची लागवड केल्यानंतर चार महिन्यांमध्येच हे पीक तयार होते. औषधांसोबतच या पिकापासून बनवलेल्या तेलाला देखील बाजारात चांगली मागणी आहे आणि किमतही चांगली मिळते. या पिकाच्या शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या खताची आवश्यकता भासत नाही. आणि हे पीक एकदा पेरले की पाच ते सहा वर्षापर्यंत ते चालते. याची पेरणी फेब्रुवारी ते जुलै च्या दरम्यान करता येते. एकदा याची पेरणी केली की, पाच ते सहा वेळा याची कापणी करता येते. यापासून तयार केल्या जाणाऱ्या तेलाची किंमत हजार ते दीड हजार रु लिटर अशी असते. एका एकरातून साधारण ५ ते ६ लिटर तेल निघते. गणिती रुपात हिशोब करायचा झाल्यास याच्या लागवडीसाठी ३० ते ४० हजार रु. खर्च येतो आणि एका वर्षात ३ ते ४ वेळा याची कापणी करता येते. म्हणजे साधारण वर्षाकाठी १ ते दीड लाख रु. इतके उत्पादन या पिकातून मिळते. त्यामुळे जर कमी कालावधीत चांगला नफा मिळवायचा असेल तर लेमन ग्रास ची शेती करायला हरकत नाही.

आले पिकासाठी ठिबकद्वारे पाणी, अन्नद्रव्य व्यवस्थापन

दर्जेदार उत्पादनासाठी आले पिकास ठिबक सिंचनातून पाणी आणि अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते. पिकासाठी पाणी, अन्नद्रव्ये कार्यक्षम मुळांच्या कक्षेत दिली गेल्याने पुरेपूर वापर होतो. पाण्यात ५० टक्के आणि खतात ३० टक्के बचत होते.

राज्यामध्ये आले पिकाची सरासरी दर एकरी उत्पादकता आणि गुणवत्ता कमी आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे अयोग्य बेण्याची निवड, पाणी व खतांचे अयोग्य नियोजन, तणनियंत्रणाचा अभाव, रोग, किडींचा प्रादुर्भाव, मायक्रो स्प्रिंकलर वापरातील त्रुटी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. दर्जेदार उत्पादनासाठी आले पिकास ठिबक सिंचनातून पाणी आणि अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे फायदेशीर ठरते. ठिबक सिंचनामध्ये नळीच्या आतून ड्रीपर असणारी इनलाइन ड्रीप पद्धती वापरावी. शेतात सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात पाणी व खते मिळण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार ठिबक नळीतील अंतर, ड्रीपरमधील अंतर व ड्रीपरचा ताशी प्रवाह असावा.

जमिनीचा प्रकार- हलकी कमी खोलीची जमीन-मध्यम खोली ते जास्त खोलीची भारी जमीन. ठिबक नळीतील अंतर-४ ते ४.५ फूट-४.५ ते ५ फूट ड्रीपर मधील अंतर-३० सेंमी.-४० सेंमी. ड्रीपरचा ताशी प्रवाह-१ लिटर/तास-२ लिटर/तास

फायदे : पिकासाठी पाणी, अन्नद्रव्ये कार्यक्षम मुळाच्या कक्षेत दिली गेल्याने त्यांचा पुरेपूर वापर होतो. पाण्यात ५० टक्के आणि खतात ३० टक्के बचत होते. उगवण लवकर होऊन वाढ जोमदार आणि एकसमान होते. वाढीच्या प्रत्येक अवस्थेवर नियंत्रण ठेवता येते. जमिनीतील पाणी, अन्न आणि हवा यांचे संतुलन राखता येते. जमीन कायमस्वरूपी वाफसा स्थितीत ठेवली जाते. यामुळे पाणी व अन्नद्रव्य शोषण कार्यक्षमपणे होते. हवे तेवढेच पाणी मुळांशी दिल्याने बुरशी, तण आणि कीड, रोगांचा प्रादुर्भाव फारच कमी होतो. ठिबक सिंचनाद्वारे पाणी सुरू असतानाही भरणी, फवारणी करता येते. उच्च दर्जाचे उत्पादन मिळते. उत्पादनात ३५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ होते. ठिबक सिंचनातून पाणी व्यवस्थापन : आले हे पीक मुळांशी योग्य तितकाच ओलावा याबाबत खूपच संवेदनशील आहे. प्रमाणापेक्षा जास्त ओलावा झाल्यास कंदकुजीचा प्रश्न दिसतो.

पाण्याची गरज काढण्याचे सूत्र : पाण्याची गरज (मिमी.) = बाष्पीभवन (मिमी./दिन) पीक गुणांक बाष्पपात्र गुणांक. दर एकरी पाण्याची गरज = एकराचे क्षेत्रफळ (चौरस मीटर) प्रति दिन पाण्याची गरज. उदा. बाष्पीभवन जर ५ मिमी./दिन असेल आणि पीक गुणांक ०.५ आणि बाष्पपात्र गुणांक जर ०.८ धरला तर एकरी पाण्याची गरज (लिटर/दिन) = ५/०.५/०.८ ४००० = ८,००० लिटर. ७५ दिवसांनी भरणीच्या वेळी प्रति एकरी द्यावयाची खते खताचा प्रकार-खते (किलो/एकर) डीएपी-५०. अमोनिअम सल्फेट-५०. एसओपी-५०. सूक्ष्म अन्नद्रव्ये-१०. निंबोळी पेंड-२००.

जनावरांमध्ये खूर वाढीची कारणे आणि उपाय



जनावरांमध्ये खुरांची वाढ ही एक सतत, नैसर्गिक प्रक्रिया आहे. फिरते पशू आपले खूर घासत राहतात. त्यामुळे खूर योग्य आकारात राहतात. परंतु दिवसेंदिवस कमी होत चाललेली कुरण जमीन, असंतुलित पशुपालन, लहान जागेत जनावरे बांधून त्यांचे पालनपोषण, खुरांची योग्य काळजी, छाटणी आणि घासणीच्या अभावामुळे जनावरांच्या खुरांच्या आजाराचे प्रमाण खूप वाढत आहे. त्यामुळे जनावरे चालण्यास किंवा उभे राहण्यास असमर्थ बनतात. त्याचवेळी, जनावरांचे आरोग्य झपाट्याने बिघडू लागते. परिणामी जनावर आजारी आणि अशक्त दिसते. त्यामुळे उत्पादनाची पातळी विस्कळित होते. ही समस्या शेळ्यांपासून गाई, म्हशींपर्यंत सर्वच लहान प्राण्यांमध्ये दिसते. या समस्येमुळे पशुपालकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

बंदिस्त पद्धती :एकाच ठिकाणी जास्त वेळ जनावरे बांधून पशुपालन. त्यामुळे जनावरांच्या खुरांची झीज होत नाही, ती सतत वाढत राहतात.

नैसर्गिक कारणे :कधीकधी नैसर्गिक कारणांमुळे किंवा आनुवंशिक/आनुवंशिक गुणांचे हस्तांतर किंवा शारीरिक विकृती इत्यादींमुळे, जनावरांच्या खुरांची झपाट्याने वाढ दिसून येते. त्यामुळे जनावरांचे खूर सामान्यपेक्षा मोठे होतात. याशिवाय म्हातारपणामुळे खुरे वाढतात. जास्त प्रमाणात कॅल्शियमची कमतरता झाल्यास त्याचा खुरावर परिणाम दिसतो. जनावर खूप कमकुवत झाले तरी खुराची जास्त वाढ ही दिसून येते. जेव्हा जनावरांना संतुलित आहार मिळत नाही तेव्हा खूर निरंतर वाढत राहातात. जनावराला चालता येत नसतानाही खुरांची अति वाढ होत असते.

लक्षणे :जनावराचे खूर इतके वाढतात की जेव्हा चालण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा खुरांच्या जास्त वाढीमुळे जनावर अडखळते. त्यामुळे वेदना होतात. गुडघ्यावर पाय वाकवून किंवा लांब खुरांनी चालण्याचा प्रयत्न करतात. खूर फार मोठे झालेले दिसतात. जनावर लंगडते.ज्या पायाचे खूर जास्त प्रमाणात वाढलेले आहे त्या पायाचा उपयोग चालताना करत नाही. जनावर चालण्याचा कंटाळा करते.चालताना जनावराला वेदना होतात. चारा खाण्याचे प्रमाण कमी होते. हळूहळू दूध उत्पादनही कमी होते.शारीरिक वाढीचा वेग कमी होतो. मादी जनावर वेळेवर माजावर येत नाही आणि नर प्रजनन कार्यात उदासीन होतो.

जनावराच्या खुराला जखमा होतात. वाढलेल्या खुराला जास्त दुखापत झाल्यामुळे रक्तस्राव होतो. जनावर अत्यंत अशक्त आणि सुस्त, मलूल झाल्याचे दिसून येते.

उपचार :या समस्येवर उपचार म्हणजे खूर कापणे हा आहे. जनावरांमध्ये अतिवृद्धी झालेल्या खुरांच्या समस्येवर उपचार करण्यासाठी, अतिवृद्धी झालेल्या जनावराला इतर जनावरांपासून वेगळे करावे. तज्ञ पशुवैद्यकाकडून योग्य पद्धतीने जनावराचे वाढलेले खूर योग्य प्रमाणात कापून घासले पाहिजेत. खूर एका मर्यादेपेक्षा जास्त कापले जाऊ नयेत, कारण जास्त कापल्याने जनावरांना त्रास होऊ शकतो. पशुवैद्यकाकडून वेळोवेळी जनावराची तपासणी करून शिफारस केलेले उपचार करावेत. खूर कापण्यासाठी हूफ कटर यंत्राचा वापर करावा.

प्रतिबंधक उपाययोजना : पशुपालन करताना जास्त काळ जनावरांना एकाच ठिकाणी चारा देणे आणि बांधणे टाळावे. जनावरांना वेळोवेळी चरायला पाठवावे. जेणेकरून खूर नैसर्गिकरित्या जीर्ण होऊन योग्य आकारात राहातात. पशुपालन सुरू करण्यापूर्वी तज्ञ पशुवैद्यकाचा सल्ला घेऊन त्यांनी सुचविलेल्या योग्य प्रजातींची पशुसंवर्धनासाठी निवड करावी. जास्त प्रमाणात वाढलेले खूर असलेल्या नर किंवा मादीची प्रजननासाठी निवड करू नये. खुरांचे निरीक्षण करावे. संतुलित आहार द्यावा.गोठ्याची नियमित स्वच्छता आवश्यक करावी. खुरांवर जंतुनाशक उपचार करावेत. स्वच्छ आणि साफ कुरणांमध्ये जनावरांना चरण्यासाठी पाठवावे. जनावरांना फिरण्यासाठी, व्यायाम करण्यासाठी आणि चरण्यासाठी पुरेशा मोकळ्या जागेची व्यवस्था करावी. लहान जागेत मोठ्या संख्येने जनावरे पाळणे टाळावे. नियमितपणे जनावरांच्या खुरांची तपासणी करून कापणी करावी.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८८२ : थॉमस एडिसन यांनी इतिहासातील पहिल्या व्यावसायिक विद्युत ऊर्जा प्रकल्प चालु केले वीजयुगाची सुरुवात म्हणून हा दिवस ओळखला जातो.
१८८८ : जॉर्ज इस्टमन याने 'कोडॅक' हा ट्रेडमार्क नोंदवला व फिल्म कॅमेर्‍याचे पेटंट घेतले.
१९०९ : लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या स्काऊटचा पहिला मेळावा झाला.
१९३७ : व्हेनिसमधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'प्रभात'च्या 'संत तुकाराम' या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली. इतर दोन चित्रपट होते ऑस्ट्रेलियाचा 'फ्लाइंग डॉक्टर' आणि हंगेरीचा 'मारिया नोव्हेर'.
१९०९ : बालवीर चळवळीचा पहिला मेळावा झाला. लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सुरू केलेली ही चळवळ थोड्याच काळात जगभर पसरुन लोकप्रिय झाली.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी 'गुगल'ची स्थापना केली.
१९७२ : मार्क स्पिटझ हा एकाच ऑलिम्पक स्पर्धेत ७ सुवर्णपदके मिळवणारा पहिला खेळाडू बनला.
१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी गुगलची स्थापना केली.
२००१ : या कंपनीने संगणक क्षेत्रातील ही बलाढ्य कंपनी २५ अब्ज डॉलर्सला विकत घेतली.
२०१२ : लंडनमध्ये मध्ये झालेल्या पॅरालंपिक स्पर्धेत भारतीय पॅरालंपिक खेळाडू गिरीशने उंच उडी क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून दिले.
२०१३ : रघुराम राजन यांनी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'चे २३ वे गव्हर्नर म्हणुन पदभार हाती घेतला.
२०१८ : युवा भारतीय बॅडमिंटनपटू अनुष्का पारीख आणि सौरभ शर्मा यांनी युक्रेनच्या खारकिव्ह येथे खारकिव्ह आंतरराष्ट्रीय चॅलेंजच्या मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२१ : श्री चक्रधर स्वामी महानुभाव पंथाचे संस्थापक (मृत्यू: ७ फेब्रुवारी १२७४)
१८२५ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (मृत्यू: ३० जून १९१७)
१८८० : भारतीय स्वातंत्र संग्रामातील प्रसिद्ध क्रांतिकारक तसचं, प्रख्यात समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ भूपेंद्रनाथ दत्त यांचा जन्मदिन.
१८९५ : प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक व राष्ट्रकवि मैथिलीशरण गुप्त यांचे छोटे भाऊ सियाराम शरण गुप्त यांचा जन्मदिन.
१९०१ : जॅग्वोर कार चे सहसंस्थापक विल्यम लियन्स जॅग्वोर यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९८५)
१९०५ : मिनॉक्स चे शोधक वॉल्टर झाप यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै २००३)
१९१३ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९९८)
१९२३ : भारतीय वकील आणि राजकारणी राम किशोर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००३)
१९३७ : शंकर सारडा साहित्यिक व समीक्षक. सारडा यांनी ६० हून अधिक पुस्तकं लिहिली असून, दोन हजारांहून अधिक पुस्तकांचं समीक्षण केलं आहे. (मृत्यू: २८ जानेवारी २०२१)
१९४१ : सुशीलकुमार शिंदे प्रसिद्ध भारतीय राजकारणी व भारतीय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसचं, माजी केंद्रीय गृहमंत्री
१९५२ : ऋषी कपूर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते
१९६२ : किरण मोरे भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू आणि यष्टीरक्षक तसचं, बीसीसीआय निवड समितीचे माजी अध्यक्ष
१९६४ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर २०१५)
१९७१ : लान्स क्लूसनर दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : भारतेंदु कालीन अग्रगण्य साहित्यिकांपैकी एक सुप्रसिद्ध साहित्यकार मोहनलाल विष्णू पंड्या यांचे निधन.
१९९७ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (जन्म: २५ डिसेंबर १९२६)
२००० : मोहम्मद उमर 'मुक्री' आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (जन्म: ५ जानेवारी १९२२)
२०१२ : भारतीय लेखक सय्यद मुस्तफा सिराज यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९३०)
२०१२ : भारतीय गायक-गीतकार हांक सूफी यांचे निधन. (जन्म: ३ मार्च १९५२)
२०१५ : भारतीय सर्जन आणि राजकारणी विल्फ्रेड डी डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १९२७)

नुकसानग्रस्त पिकांचे स्पॉट पंचनामे करुन तात्काळ मदत जाहीर करावी-थावरे

माजलगाव। प्रतिनिधी

जिल्हाभरात दोन-चार दिवस झाले पावसाने धुमाकूळ घातला आहे यामध्ये शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेल्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त पिकांचे शासनाने पंचनामे करावेत अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे गंगा भीषण थावरे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

संततधार व मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे खरिपातील कापूस, सोयाबीन, कांदा, तुर व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शासनाने मागील पिकविमा दिलेला नाही सन २०२३ चे आनुदान अद्यापही मिळालेले नाही. शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या वर्षी सुरूवातीला पाऊस पडत गेले त्यामुळे पिके जोमात आली होती परंतू दोन चार दिवसापासून संततधार व मुसळधार मोठा पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतातीतील कापुस सोयाबीन कांदा व भाजीपाला यासारख्या पिकाचे अतोनात नूकसान झाले आहे. सतत पडणारा पाऊस बंद झाला नाही तर ८० टक्के पिके गेल्याशिवाय राहणार नाहीत त्यामुळे प्रशासनाने नुकसान झालेल्या पिकाचे लवकरात लवकर पंचनामे करावे व हेक्टरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई आनुदान द्यावे, धारुर वडवणी माजलगाव तालुक्यातील अनेक नद्यांना आलेल्या पुरामुळे नदीकाठच गावांतील पिकांचे मोठे नुकसान झाले असून गोदावरी नदीला ही नुकसान मोठा पूर आला आहे. परिणामी गव्हाणथडी, हिवरा, काळेगाव, डुबाथडी, कवडगाव व नदीकाठच्या गावात पुराचे पाणी घुसले असल्याने येथील ग्रामस्थांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे . म्हणून या मतदार संघातील नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची व विमा कंपनीला वीमा कंपनीने स्पॉट पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी भाई गंगाभीशन थावरे यांनी केली आहे.

मुसळधार पावसामुळे शेतातील पिके पाण्याखाली

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यामधील अंबड घनसावंगी मंठा परतूर भोकरदन जाफराबाद जालना या तालुक्यामध्ये मुसळधार पावसामुळे शेतकऱ्याचे पीक पाण्याखाली झोपलो असून यामुळे शेतकरी बळीराजाला राज्य सरकारने तत्काळ मदत देण्याची मागणी शेतकरी बळीराजाकडून होत आहे .

मुसळधार पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याची भयावह स्थिती निर्माण झाली आहे. पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली असून, खरीप हंगाम हातातून जाण्याची परिस्थिती आहे. रविवार (ता. १) सकाळी ८ वाजेपासून सतत मुसळधार पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ग्रामीण भागासह शेतातील पिके पाण्याखाली गेली आहे. मुसळधार पावसाने हजेरी लावली. होत असलेल्या पावसामुळे सर्वत्र दाणादाण उडाली आहे.

शेतात पावसाचे पाणी साचून राहिल्याने अनेक ठिकाणी पिके सडू लागली आहेत. तर काही भागांत पिके आडवी होऊन नुकसान झाले. परिसरात पिकांना मोठा तडाखा बसत आहे. सातत्याने पाणी साचून राहिल्याने भाजीपाला पिके सडू लागली आहेत. त्यामध्ये सर्वाधिक नुकसान पिकांचे आहे पिके पाण्याखाली गेली असुन पिकांचे मोठे नुकसान झाले यामुळे महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावे अशी मागणी शेतकरी बळीराजाकडून करण्यात येत आहे

पिएसआय कै.मच्छिंद्र नन्नवरे,कै.पंडित खोडवे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर

सपोनि आण्णाराव खोडेवाड यांचा स्तुत्य उपक्रम

कै. मच्छिंद्र नन्नवरे साहेब व कै. पंडीत खोडवे साहेब यांच्या स्मरणार्थ
व अण्णाभाऊ साठे यांची ...४ जयंती निमित्त
भव्य रक्त... शिबीर
शनिवार दिनांक ३१ ऑगस्ट ...४
रक्तदान करूया..

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे कार्यरत असणारे पीएसआय कै मच्छिंद्र नन्नवरे साहेब यांचे अपघाती व शिरसाळा पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस कै पंडित खोडवे यांचे हृदयविकाराने निधन झाल्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीचे औचित्य साधून दिंद्रुड पोलिस स्टेशन च्यावतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.दिंद्रुड पोलीस स्टेशनचे प्रभारी सपोनि अण्णाराव खोडेवाड यांनी समाजातील सर्व घटकातील लोकांना सोबत घेऊन राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक होत आहे.

दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पीएसआय कै.मच्छिंद्र नन्नवरे साहेब व शिरसाळा येथील पोलीस कै. पंडित खोडवे साहेब यांचे अकस्मात निधन झाल्यामुळे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधत बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा.अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके व सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. धीरज कुमार यांच्या मार्गदर्शनाख़ाली दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांनी दिंद्रुड पोलीस स्टेशनमध्ये महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरामध्ये परिसरातील १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोठ्या आनंदात आपला सहभाग नोंदवला. या रक्तदान शिबिरास केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांचे सहाय्यक खासगी सचिव डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्यासह परिसरातील अनेक गावचे सरपंच, प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस स्टेशनच्या आवारात रक्तदान शिबिरासारखा सामाजिक आणि लोकोपयोगी उपक्रम घेतल्याबद्दल पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून या ठिकाणी केलेले रक्त संकलन सर्वसामान्य व गरजू रुग्णांच्या कामी येईल यातच खरा आनंद असल्याचे सपोनि खोडेवाड म्हणाले. सदरील रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि अण्णाराव खोडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.ज्ञानेश्वर धोत्रे, पोलीस कर्मचारी नंदू वाघमारे, श्रीपती चौरे,बालाजी सुरेवाड,युवराज श्रीडोळे,महेश साळुंके आदीनी परिश्रम घेतले. वैद्यनाथ ब्लड बँकेचे बिभीषण सांगळे, योगेश सांगळे,संतोष चोले,गोपीनाथ सांगळे,अस्लम शेख,गायत्री काळे,भाविका गाटे,भाग्यश्री दहारे,अश्विनी खराडे यांनी रक्त संकलन करण्यासाठी मेहनत घेतली.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १९वर्षाखालील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.

यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत. गोळाफेक -१)वैभव खांडगे २)शुभम घडसे थाळीफेक १)प्रताप खोडवे २)शुभम घडसे हॅमर थ्रो १)वैभव खांडगे आठशे मीटर धावणे १)पवन हरदास -द्वितीय पंधराशे मीटर धावणे १)प्रवीण राठोड -तृतीय मुलींमधून हॅमर थ्रो स्पर्धेत १) अमृता नागरगोजे -प्रथम शंभर मी. धावणे १)मेहर शिंदे - द्वितीय उंच उडी १)अमृता नागरगोजे -द्वितीय या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रा. दिनेश गडदे व डॉ उमेश साडेगावकर यांनी केले. भारत माता सभागृहात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ युवराज मुळ्ये, प्रा. अंकुश साबळे, नूतन पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले.

श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलग

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गजानन होन्ना म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या काळात अभ्यासासोबत आरोग्य सुधारणे महत्वाचे आहे कारण तरुणांनी शरीर सुधारले तरच राष्ट्राची प्रगती होईल असे ते म्हणाले.

नूतन पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री यांचेही या प्रसंगी पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.या सर्व यशस्वी खेळाडूंचे भा शि प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, केंद्रीय कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रकाश दुगड, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, ऍड. विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख अभय कोकड, प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या आहेत.

आदित्य ठाकरे, संजय राऊत, अंबादास दानवे बुधवारी मंठा दौऱ्यावर

मंठा : परतुर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शिवसेना नेते आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत आणि राज्याची विरोधी पक्षनेते ना. अंबादास दानवे बुधवार ता.४ रोजी मंठा तालुक्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात त्यांच्यासोबत खासदार संजय जाधव, आमदार राजेश राठोड, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे, उपसभापती गोपाळराव बोराडे,ॲड. पंकज बोराडे उपस्थित राहणार असून मंठा, पांगरी खुर्द यासह काही गावांना भेटी देऊन नुकसान झालेल्या शेतीपिकांची पाहणी करणार आहे. यावेळी ते शेतकऱ्यांशी संवाद साधणार असून यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख अजय अवचार, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष निळकंठ वायाळ, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बबनराव गणगे यांनी केले आहे.

एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही-उदयसिंह बोराडे

जिल्हाधिकारीकडून नुकसानग्रस्त भागाची पाहणी

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुका अतिवृष्टीग्रस्त भागाची जिल्हाधिकारी पांचाळ यांनी केली पाहणी. तालुक्यात पावसाने हाहाकार उडवून दिला असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे . जिल्हाधिकारी पांचाळ यांची शिवसेना जालना शिष्टमंडळ यांनी दिनांक २ सप्टेंबर रोजी आढावा बैठक घेऊन कलेक्टरांना पंचनामेची विनंती केली तर आज दिनांक ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून मंठा तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांची पाहणी केली. मंठा तालुक्यातील वाडी रानमळा,पांगरी खु,केंधळी ,या ठिकाणी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या आहेत . नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून तात्काळ अहवाल सादर करावा , एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची दखल घेऊ असेही

यावेळी जिल्हाधिकारी श्री पांचाळ यांनी सांगितले, यावेळी एस डी एम गायकवाड , तहसीलदार सोनाली जोंधळे,मंडळ अधिकारी श्रीकांत गदेवाड, कृषी अधिकारी खोबरे,शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख योगेशराव गणगे, युवा सेना उपतालुकाप्रमुख लिंबाजी बोराडे, खोराडसावंगी सर्कल प्रमुख सर्कल प्रमुख माऊली वायाळ, सुनील गुंड व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जशने ईद-ए- मिलादुन्नबी अध्यक्षपदी सय्यद सलीमबापु

माजलगाव । प्रतिनिधी

मानव जातीला शांतीचा संदेश देणारे पैगंबर मोहम्मद सल्लल्ला ओ सल्लम यांचा जन्मदिवस जगात ईद-ए-मिलादुन्नबी म्हणून साजरा केला जातो.त्यानिमित्त माजलगावच्या जशने ईद-ए-मिलादुन्नबी अध्यक्षपदी समाजसेवक माजी नगरसेवक सय्यद सलीमबापू यांची दुसऱ्यांदा सर्वानुमते निवड करण्यात आली. मुस्लिम समाजातील लोकांमध्ये ईद-ए-मिलादला मोठे धार्मिक महत्त्व आहे.

हा दिवस जगभरातील सर्व मुस्लिम मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात. ईद मिलाद उन नबी हा इस्लामिक कॅलेंडरचा तिसरा महिना असलेल्या रबी उल अव्वलच्या १२ व्या दिवशी साजरा केला जातो.

हा दिवस पैगंबर मोहम्मद यांची जयंती आहे.माजलगाव शहरात जशने ईद मिलादुन्नबी निमित्त सर्व जाती धर्मातील बांधवांच्या साक्षीने १६ सप्टेंबर रोजी विविध कार्यक्रम घेतले जातात.मिठाई,शरबत वाटल्या जाते,शांततेत जुलूस काढला जातो.

गेवराई शहरात बैल पोळा सण साजरा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. युवा नेते शिवराज बाळराजे पवार पाटील यांनी हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घालून ,वेशीवर फुलांच्या माळांनी बांधलेले तोरण तोडून पोळा फोडला. शहरातील शेतकर्यांनी वेशीतून सजवलेल्या बैलांना वाजतगाजत मिरवून आणले. दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असल्याने, पोळा सणाच्या उत्साहात भर पडल्याचे दिसून आले.

पोळा पहाण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती. सोमवार ता. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई शहरातील शेतकरी, दरवर्षी प्रमाणे शास्त्री चौकात पोळा सण साजरा करण्यासाठी एकत्र आले होते. गेवराई चे पाटील शिवराज बाळराजे पवार यांनी सजवलेल्या बैलांची मिरवणूक काढून ग्रामदैवतांची पुजा केली. त्यांनी वेशीवर बांधलेले तोरण तोडून बैल पोळा फोडला. त्यानंतर, शेतकर्यांनी सजवलेल्या बैलांची वेशीतून मिरवणूक काढली. ढोल ताशा , हलगीच्या तालाने शास्त्री चौकातला परिसर दणाणून गेला. गेल्या दोन दिवसांपासून गेवराई तालुक्यात संततधार पाऊस पडत असून, पोळा उत्साहात पार पडल्याचे चित्र दिसून आले. नागरीकांनी पोळा पाहण्यासाठी गर्दी केली होती. पोलिस निरीक्षक प्रविणकुमार बांगर, पोलिस अधिकारी संतोष जंजाळ, डॉ. भुतेकर , यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

अंबड पोलीस ठाण्यातील हेड कॉन्सटेबल लाच घेतांना चतुर्भुज

अंबड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्सटेबल म्हणून कार्यरत असलेले वय-५६ वर्षे, बक्कल क्रं १०४८ नेमणुक पोलीस ठाणे अंबड जि. जालना रा. नंदनवन कॉलनी, अंबड रोड,जालना यांना अंबड पोलीस स्टेशनमध्ये जालना लाचलुचपत विभागाने बारा हजार रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.याबाबत अधिक माहिती अशी कि यातील तक्रारदार यांचे विरूद्ध पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा दाखल होता त्या गुन्ह्याचा तपास आलोसे यांचेकडे होता. सदर गुन्ह्यात तक्रारदार यांना मदत करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १२,००० रूपये लाचेची मागणी केली.

त्यावरुन सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना तक्रारदाराचे विरुद्ध दाखल गुन्ह्याचे तपासात मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष १२,०००/- लाचेची रक्कम स्वीकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर लाचेची रक्कम जप्त करण्यात आली असून आलोसे प्रताप रेवाजी चव्हाण पोहेकॉ/१०४८ यांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन अंबड ज़ि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असल्याची माहिती तथा सापळा अधिकारी बी. एस. जाधवर, शिवाजी जमधडे यांनी दिली आहे.

पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो जालना यांनी दिली.

सदरची कारवाई लाचलुचपत विभागाचे पोलीस अधीक्षक, संदीप आटोळे,अप्पर पोलीस अधीक्षक,

मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी केली असुन सापळा पथकातपोलीस अंमलदार शिवाजी जमधडे गजानन घायवट,गणेश चेके,गणेश बुजाडे, शिवलिंग खुळे,विठ्ठल कापसे यांचा समावेश होता.लोकसेवक अथवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी व्यक्ती कायदेशीर काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल लाचलुचपत विभागाशी संपर्क करण्याचे आवाहन बी. एस. जाधवर, यांनी केले.

क्रमांक. २०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि- २१०
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. २१/०८/२०२४

जाहिरनामा

जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे, तांदळवाडी ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्री. सखहारी पिता संतराम उर्फ संतोबा साखरे रा. तांदळवाडी ता. धारुर ह. मु. समर्थ नगर केज ता. केज जि. बीड यांचे वडील नामे संतराम उर्फ संतोबा बापुराव साखरे यांच मृत्यु दिनांक ०१/०२/१९९४ रोजी मौजे, तांदळवाडी ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहु मृत्युची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे वडीलाचे कायदेशीर मृत्युचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल त हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकत कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्यात सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदर अर्जदारांचे मृत्युचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक. २१/०८/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीदार,धारूर

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१९६/२०२४
तुकाराम अंजराम काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

तुकाराम अंजराम काशिद रा.साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत देवराव बापु काशिद** यांचा दिनांक १५/०८/१९४५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०९/२०२४ ही आहे.

मार्फत
ॲड. मिलिंद उबाळे

स्वाक्षरित
तहसिलदार, बीड

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१९७/२०२४
शशिकांत परशुराम काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

शशिकांत परशुराम काशिद रा.साक्षाळपिंप्री ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत रानुजी बापु काशिद** यांचा दिनांक २०/०३/१९४२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०९/२०२४ ही आहे.

मार्फत
ॲड. मिलिंद उबाळे

स्वाक्षरित
तहसिलदार, बीड

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१९९/२०२४
गोरख लक्ष्मण लोमटे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, गवारी/सफेपुर ता. जि. बीड

गोरख लक्ष्मण लोमटे रा.गवारी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत गोपाळ रामा लोमटे** यांचा दिनांक ०४/०५/१९१० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास गवारी/सफेपुर ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे गवारी/सफेपुर ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०९/२०२४ ही आहे.

मार्फत
ॲड. मिलिंद उबाळे

स्वाक्षरित
तहसिलदार, बीड

राज्य
लोकतंत्र
बुधवार दि.०४ सप्टेंबर २०२४

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान, शेतकरी हवालदिल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात मागिल आठवडचात झालेल्या जबरदस्त अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होताना दिसत आहे, पिकांवर या अतिवृष्टीचा वाईट परिणाम होताना पहावयास मिळत आहे, कापूस मोठ्या प्रमाणावर ओंबळून जात आहे, हे नुकसान होताना पाहून शेतकरी हवालदिल होत आहेत. ताबडतोब करा कापूस पिकातील आकस्मिक मर व्यवस्थापन. बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. आकस्मिक मर व्यवस्थापन १. अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा. २. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. ३. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया+ १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी.* किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. ४. वरील प्रमाणे द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू

लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाययोजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. या सोबतच ट्रायकोडर्मा विरीडी या बुरशीची आळवणी करावी, १०० /१० लिटर प्रमाणे अशी माहिती कृषी विभागा मार्फत तालुका कृषी अधिकारी जे.बी.भगत यांनी दिली.: माजलगाव तालुक्यात मागिल आठवडचात झालेल्या जबरदस्त अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होताना दिसत आहे, पिकांवर या अतिवृष्टीचा वाईट परिणाम होताना पहावयास मिळत आहे, कापूस मोठ्या प्रमाणावर ओंबळून जात आहे, हे नुकसान होताना पाहून शेतकरी हवालदिल होत आहेत. ताबडतोब करा कापूस पिकातील आकस्मिक मर व्यवस्थापन. बऱ्याच ठिकाणी झालेल्या पाऊसानंतर कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवर सुकू लागलेली आहेत. याला आकस्मिक मर असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर मध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. आकस्मिक मर व्यवस्थापन १. अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करवा. २. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. ३. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया+ १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. ४. वरील प्रमाणे द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाययोजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्यात जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. या सोबतच ट्रायकोडर्मा विरीडी या बुरशीची आळवणी करावी, १०० /१० लिटर प्रमाणे अशी माहिती कृषी विभागा मार्फत तालुका कृषी अधिकारी जे.बी.भगत यांनी दिली.

बीड : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरानजीक माळावरील शेतात बैलपोळा सणानिमित्त सर्जा-राजाचे पूजन केले. याप्रसंगी डॉ.दीपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आदींची उपस्थिती होती.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या -राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनीधी

संपूर्ण बीड जिल्ह्यात सर्वदूर अतिवृष्टी पेक्षा ही मोठा पाऊस झाला आहे. या पावसाने जिल्ह्यात सर्वत्र हाहाकार उडाला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ६१ महसूल मंडळात प्रचंड वृष्टी झाली आहे. जिल्ह्यातील ४ महसूल मंडळात १५० मि.मी. तर ३१ महसूल मंडळात १०० मि.मी. पेक्षा ही अधिक पाऊस झाला आहे. या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट भरपाई द्यावी अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात २४ तासांहून अधिक काळ सलग संततधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी अतिवृष्टी पेक्षा ही मोठा पाऊस झाला. अतिवृष्टीने सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका, मुग, कापूस, भुईमूग, पिवळा, उडीद, कांदा, आद्रक, तीळ, सूर्यफूल या खरीप पिकांची, भाजीपाल्याची पूर्ण वाट लागली आहे. शेतकरी धाय मोकलून रडत आहेत. असंख्य ठिकाणी सखल भागात गुडघाभर पाणी साचले आहे. अनेक ठिकाणी घरांची पडझड होऊन संसारोपयोगी साहित्याचे तसेच पशुधनाचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी मनुष्यहानी झाली असल्याचे ही समजते. तेव्हा शासनाने झालेल्या नुकसानीची पाहणी करून तात्काळ

◀◀ पान ३ वर

माजलगावात २८ कोटी रूपयांच्या स्त्री रूग्णालयास मान्यता

सहा महिण्याच्या कालावधीत उभारणार इमारत

आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावात २८ कोटी ६८ लक्ष रूपयांचे साठ खाटांचे स्त्री रूग्णालयास मान्यता मिळाली असुन सहा महिण्याच्या कालावधीत रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

शहरामध्ये स्त्री रूग्णालय नसल्याने महिलांना इतर ठिकाणी उपचारासाठी जावे लागत होते. यामध्ये महिलांची मोठी परेशानी होती. त्यामुळे माजलगाव शहरात स्वतंत्र स्त्री रूग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी होती. याची दखल घेत आ.

प्रकाश सोळंके यांनी या रूग्णालयाबाबत शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. त्यामुळे रूग्णालयाची मागणी शासनाच्या विचाराधीन होती. दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत झाला असुन साठ खाटांचे स्त्री रूग्णालय मुख्य इमारत बांधकामास २८ कोटी ६८ लक्ष रूपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे माजलगाव शहरात स्त्री रूग्णालय उभारण्यात येणार असुन सहा महिण्यांमध्ये स्त्री रूग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती आ. प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या महाराष्ट्र सचिवपदी प्रितम पवळ

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रितम सोन्याबापू पवळ अर्थातच प्रेम कवी हे गेल्या आठ नऊ वर्षांपासून साहित्य क्षेत्रात जोमाने काम करतं आहेत पंतप्रधान, मुख्यमंत्री, राज्यमंत्री, आमदार, खासदार यांच्या हस्ते त्यांचा गुणगौरव देखील करण्यात आला आहे व अनेक संस्थेमार्फत अनेक राज्यस्थरीय पुरस्कार देखील मिळाले आहेत महाराष्ट्राचा काव्यसम्राट, समाज रत्न ,आर्दश कवी, उत्कृष्ट कवी,अशा विविध पुरस्काराने सन्मानित झाले आहेत त्यांचे आजपर्यंत तीन काव्यसंग्रह व एक वात्रटिका संग्रह दिग्गज व्यक्तीच्या हस्ते प्रकाशित आहेत ते साहित्य क्षेत्राबरोबरच एक निर्भिड पत्रकार देखील आहेत याचीच दखल घेऊन त्यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियन यांच्याकडून महाराष्ट्र सचिव पदी निवड करण्यात आली ही निवड संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष अजीत म्हामूनकर यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. चित्रपट क्षेत्रात तरुण पीढीचे सकारात्मक विचार रुजावेत तसेच समाजप्रबोधनपर चित्रपट निर्माण व्हावेत या उद्देशाने संघटन वाढीसाठी प्रयत्नशील राहील या उद्देशाने आम्ही प्रयत्न करत आहोत असे अजित म्हामूनकर यांनी सांगितले.

जीवाची वाडी सह परिसरात देशी-विदेशी दारूची खुले आम विक्री चालू

महिला सरपंचासह ग्रामपंचायतच्या मागणीला यंत्रणे कडून केराची टोपली

येवता । प्रतिनिधी

आप्पाराव सारूक दि०३ रोजी केज तालुक्यातील जीवाची वाडी,तुकूची वाडीसह परीसरात विना-परवाना देशी-विदेशी बनावट दारू खुले आम विक्री होत असलेचे लेखी निवेदनासह ग्राम पंचायतचा ठरावाची सत्यप्रत गावच्या प्रथम नागरीक तथा महिला सरपंच,श्रीमती प्रेरणा दिपक काळे सह ग्रामपंचायत कार्यालय,जीवाची वाडीचे पद्अधिकारी व दोन्ही गावातील महिला यांनी पुढाकार घेऊन दर वर्षा प्रमाणे याही वर्षी पोलीस अधिक्षक,बीड.यांना तारीख ०२ऑगष्ट-२०२४ रोजी प्रत्यक्षात एस पी कार्यालयात जाऊन ठरावासह निवेदन दिले, त्या निवेदनाच्या प्रतिलिपी विभागीय पोलीस आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर. तहसीलदार,के ज.अप्पर पोलीस अधिक ,अंबाजोगाई.पोलीस उपाधिक्षक,केज.अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क,बीड.पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे,केज.यांना कळऊन महिना झाले,परंतु कोणाचीही कारवाही केली गेली नाही विनापरवाना देशी विदेशी बनावट दारू विक्री रोखण्यास सबंधीत नियंत्रण विभाग अपयशी असून ना.पालकमंत्री धनंजय मुंडे यांना कार्यक्रमात निवेदन देऊनही दारु विक्री रोखन्याय यंत्रणा पुर्णतःअपयशी असलेचे परीसरात उलटसुलट चर्चा ऐकवयास मिळत आहे.

संततधार पावसामुळे खरीप पिकांचे नुकसान



शेतकऱ्यांना मोठ्या मदतीची अपेक्षा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरासह परिसरात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस असून त्यामुळे परिसरातील शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचुन पिकांचे नुकसान झाले आहे त्यामुळे पंचनामे करून मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे. शासनाने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

सततच्या मुसळधार पावसामुळे शहरातील आणि परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक गावांचा संपर्क तुटल्यामुळे महसूल प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे दोन दिवसापूर्वी रात्रीपासून पावसाला सुरुवात झाली पावसाने जोर धरल्यामुळे अनेक गावातील शेतामध्ये सर्वत्र पाणी साचले होते रात्रभर मुसळधार असलेला

◀◀ पान ३ वर

एसटी कामगार संपावर प्रवाशांचे हाल, अनेक फेऱ्या रद्द

सर्व मागण्या मान्य होईपर्यंत संप सुरू राहणार, धारूर कामगार कृती समितीचा इशारा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

सणासुदीच्या तोंडावर एसटी कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी राज्यभरात दे मुदत संप पुकारला आहे या संपामध्ये धारूर आगारातील कामगारांनी सहभाग घेतल्यामुळे बसच्या अनेक फेऱ्या रद्द करावे लागल्या त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.

शासकीय नोकर दारांप्रमाणे सर्व सेवा या एसटी कामगारांना लागू कराव्यात या मागणीसाठी एसटी कामगारांचा राज्यव्यापी बेमुदत बंद पुकारला आहे. धारूर आगरातील कर्मचारी या संपामध्ये सहभागी झाल्यामुळे अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागल्या त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले.

महाराष्ट्र शासनाने एसटी कामगारांना शासकीय सेवे मध्ये समाविष्ट करावा व शासकीय नोकरदारांप्रमाणे सर्व सेवा सुविधा व भत्ते द्यावेत या मागणीसाठी एसटी कामगार सेनेने राज्यव्यापी बंद पडला आहे या बंदमध्ये धारूर

◀◀ पान ३ वर

एसटी महामंडळाने महागाई भत्ता गरवाडे आणि वार्षिक वेतन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे परंतु याची अंमलबजावणी झाली नाही त्यामुळे आजच्या राज्यव्यापी संपामध्ये आम्ही सहभागी झालो आहोत जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत हा संप सुरूच राहील.

एसटी कामगार कृती समिती, धारूर

शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या तक्रारी क्रॉप इंन्शुरन्स ॲप वर तात्काळ नोंदवाव्यात

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मागील तीन दिवसापासून राज्यासह बीड जिल्हयात संततधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पीके अतिवृष्टीने गेलेली आहेत.या नुकसानीचे पंचनामे महसूल यंत्रणेमार्फत होतीलच परंतू पीक वीमा कंपनीच्या अटी नुसार चोवीस तासांच्या आत या नुकसानीची तक्रार फोटोसह क्रॉप इंन्शुरन्स ॲप वर करणे आवश्यक आहे.

तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या तक्रारी सदरील ॲप वर नोंदवाव्यात असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी केले आहे. या बाबतच्या अडचणी व अधीक माहीतीसाठी ९०९६६८८३६५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

महायुतीत आजबे, धस, धोंडे यांच्यात 'टस्सल; आष्टीत शरद पवारांचा मोहरा लावतोय उमेदवारीसाठी 'फिल्डिग'?

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

विशेष म्हणजे धसांची विधीमंडळ कारकीर्द आपले राजकीय गुरु असलेल्या साहेबराव दरेकर यांच्या पराभवानेच सुरु झाली. सुरेश धस व भीमराव धोंडे या दोघांनी देखील एकमेकांना पराभूत केलेले आहे.

: धक्कादायक निकालांची परंपरा

असलेल्या आष्टी विधानसभा मतदारसंघाची जागा या निवडणुकीत भाजपला की अजित पवारांच्या राष्ट्रवादीला असा पेच आहे. त्यात उमेदवारीसाठी राष्ट्रवादीचे आमदार बाळासाहेब आजबे, भाजपचे माजी आमदार सुरेश धस व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यात रस्सीखेच आहे. याच मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख चाचपणी करत आहेत. उमेदवारीसाठी त्यांनी पक्षाकडे फिल्डिंग लावली आहे.

आष्टी, पाटोदा व शिरुर कासार या तालुक्यांचा समावेश असलेला आष्टी विधानसभा मतदारसंघ जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ आहे. भीमराव धोंडे यांनी सर्वाधिक चारवेळा

◀◀ पान ३ वर

सय्यद गुरुजी साहित्य अकादमीच्या वतीने शाळेला ५१ पुस्तकांची भेट

आष्टी । प्रतिनिधी

सय्यद गुरुजी साहित्य अकादमीच्या वतीने यावर्षीच्या ५ सप्टेंबर २०२४ पासून एका शाळेला ५१ पुस्तकांची भेट देण्यात येणार आहे.ही पुस्तक भेट योजना शालेय स्तरावर असल्याने,यात लहान मुलांसाठीच्या पुस्तकांचा अधिक समावेश असणार आहे.सय्यद गुरुजी अर्थात सय्यद अमीनोद्दीन गुरुजी हे मौजे चिंचाळा,तालुका आष्टी,जिल्हा बीड येथील रहिवासी होते.त्यांनी त्यांची संपूर्ण अध्यापन सेवा ही आष्टी तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत केली.त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले.जिल्हा परिषद शाळांच्या इमारत बांधकामासाठी वेळोवेळी सरकार दरबारी गावकऱ्यांसोबत पाठपुरावा केला.विनंती केली.एका नाट्यगृह उभारणीसाठी सामाजिक,ऐतिहासिक नाटकांचे दिग्दर्शन करून ग्रामीण भागातील अनेक हौशी कलाकारांना सोबत घेऊन नाट्य प्रयोग केले. जनता वस्तीगृह शिक्षण संस्था तथा जनता विद्यालय,

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

सुसंस्कृत पुण्याची देशभरात बदनामी!

वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांवर माजी गृहमंत्र्यांचं परखड भाष्य, सरकारवर जोरदार हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात गेल्या काही दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुन्हे वाढल्याचं दिसून येत आहे. अगदी क्षुल्लक कारणावरून होणारे खून, हत्या, मारामारी, कोयत्याने वार करण्याच्या घटना, त्याचबरोबर कोयता हातात घेऊन तोडफोड करण्याच्या दहशत माजवण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहेत. अशातच दोन दिवसांपुर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची हत्या करण्यात आली, त्यानंतर दोन दिवसात खूनाच्या घटना देखील समोर आल्या आहेत, अशातच पुण्यातील एकंदरित परिस्थितीवर माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी भाष्य केलं आहे. दररोजच्या बातम्या बघून सुसंस्कृत पुण्याची देशभरात बदनामी होत असल्याचे जगजाहीर आहे, असं म्हणत त्यांनी राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

अनिल देशमुख यांनी याबाबतची पोस्ट आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. आपल्या पोस्टमध्ये देशमुखांनी राज्याच्या गृहमंत्र्यांनी या परिस्थितीवर लक्ष्य द्यावं असं आवाहन देखील केलं आहे. शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या पुणे शहरात मागच्या काही दिवसात घडलेल्या घटना कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढणाऱ्या आहेत. यातून पुणे शहराची ओळख क्राइम कॅपिटल अशी होत चालली आहे. खून, दरोडे, बलात्कार, चोऱ्या, अवैध धंदे व अमली पदार्थ या दररोजच्या बातम्या बघून सुसंस्कृत पुण्याची देशभरात बदनामी होत असल्याचे जगजाहीर आहे. शहरात टोळी युद्धाचा देखील भडका उडालाय, कोयता गँगच्या दहशतीने पुणेकर भयभीत आहेत. निष्क्रिय गृहमंत्र्यांनी या घटना गांभीर्याने घ्याव्यात आणि कठोर पावले उचलावीत, असंही देशमुखांनी म्हटलं आहे.

वनराज आंदेकर खून प्रकरणात १३ जणांना अटक, ताम्हिणी घाटातून उचललं

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या पुण्यातील माजी नगरसेवकाच्या खून प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. खुनाच्या घटनेनंतर फरार झालेल्या आरोपींनी ताम्हिणी घाटात आपला तळ ठोकला होता. मात्र, पोलिसांनी ताम्हिणी घाटातून आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. यापूर्वी हत्या झालेल्या वनराज आंदेकरांच्या बहिणींना पोलसांनी अटक केली होती. त्यानंतर, आज सायंकाळी ताम्हिणी घाटातून १३ जणांना अटक करण्यात आली आहे. जेवण्यासाठी हे सगळे जणं ताम्हिणी घाट परिसरात थांबले होते, जेवण झाल्यानंतर तामिनी घाटातून पुढे मार्गस्थ होण्याच्या आधीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. त्यामुळे, पोलिसांनी याप्रकरणात गंभीरतेने लक्ष घालून पुण्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जोमाने प्रयत्न केल्याचं दिसून येतं. या आरोपींच्या अटकेसाठी पुणे पोलिसांनी अनेक पथके नेमून शोधासाठी रवाना केली होती. दरम्यान, आंदेकर कुटुंब

गेल्या काही वर्षांतराजकारणात सक्रिय झालं. मात्र पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात या कुटुंबाचा रक्तरंजित इतिहास तब्ब्ल पाच दशकांचाय . त्यामुळं वनराज आंदेकरांच्या हत्येनंतर पुण्यातील टोळीयुद्ध भडकण्याची भीती व्यक्त होती.

नाना पेठेत १४ ते १५ हल्लेखोरांनी दुचाकीवर येऊन चौकात मित्रासोबत उभे असलेले वनराज आंदेकर (तरपीरक्ष – पवशझरी) यांच्यावर हल्ला केला. यावेळी, थेट वनराज यांच्या अंगावर धावून जात आरोपींनी गोळीबार करण्यास सुरुवात केली. काहीजण कोयता घेऊन त्यांच्या अंगावर गेले. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार वनराज आंदेकर यांना पाच राऊंडपैकी एक देखील गोळी लागली नाही. मात्र, गोळीबारानंतर (ऋळीळपस) त्यांच्यावर धारदार शस्त्रानं हल्ला करण्यात आला त्यातच वनराज आंदेकर यांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. सदर घटनेनंतर वनराज आंदेकर यांना रुणालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घरगुती संपत्तीच्या वादातूनच ही हत्या झाल्याचं प्रथम दर्शनी तपासातून समोर आलं आहे. आंदेकरांच्या हत्येला कौटुंबिक वादाची पार्श्वभूमीसोबतच आता सोमनाथ गायकवाडशी संबध जोडला जात आहे.

सोमनाथ गायकवाड हा कारागृहातून एप्रिल २०२४ मध्ये जामिनावर बाहेर आला. आंदेकर टोळीत आणि त्याच्यामध्ये धुसफूस सुरू होती. सोमनाथ गायकवाडला भीती होती की, आंदेकर टोळी आपला गेम करणार. त्यामुळे आपल्याला जिवंत राहायचंय, तर आंदेकर टोळीचा मुख्याला ठोकला पाहिजे, असे त्याने ठरवलं. गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून त्याने याबाबत आखणी करण्यास सुरुवात केली. अखेर रविवारी रात्री संधी मिळताच सोमनाथच्या पंटरांनी वनराज आंदेकरांचा गेम केला. पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात आंदेकर टोळीचा दबदबा आहे. मात्र या गुन्हेगारीपासून लांब अशी वनराज आंदेकरांची ओळख आहे. वनराज आंदेकर राजकीय क्षेत्रात सक्रिय होते. राष्ट्रवादी पक्षाकडून ते नगरसेवकदेखील झाले होते. मात्र पूर्ववैमन्स, कौटुंबिक कलह, संपत्तीवरून वनराज यांच्या खुनाचे प्राथमिक कारण आहे.

धक्कादायक! पुण्यात ८ दिवसांपूर्वी मुलाची आत्महत्या, आई-वडिलांनीही संपवले जीवन; अख्ख कुटुंब संपलं

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या संगमनेर तालुक्यात धक्कादायक घटना घडली असून मुलाच्या निधनानंतर १० दिवसांतच आई-वडिलांनी आत्महत्या केल्याचा ह्रदयद्रावक प्रकार समोर आला आहे. संगमनेर शहरातील चंद्रशेखर चौकात नजीक असलेल्या वाडेकर गल्लीत पती-पत्नीने आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडलीय. या घटनेने परिसरात मोठी शोककळा पसरली असून ८ दिवसांपूर्वीच पुणे येथे शिक्षण घेत असलेल्या त्यांच्या मुलाने देखील जीवन संपवलं होतं. २ वर्षापूर्वी त्यांच्या १६ वर्षीय मुलानेही

आई
'आई' निवास
श्री. गणेश मच्छिंद्र वाडेकर
सौ. गौरी गणेश वाडेकर

आत्महत्या केली होती, त्यामुळे एकाच कुटुंबातील चौघांनी अशाप्रकारे जीवन संपवल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

पुण्यात शिक्षण घेत असलेल्या मुलाने आत्महत्या केल्यानंतर मुलाच्या दहाव होण्यापूर्वीच वडिल गणेश मच्छिंद्र वाडेकर आणि आई गौरी गणेश वाडेकर यांनी आपली जिवनयात्रा संपवलीय. या घटनेनं परिसरात शोककळा पसरली असून वाडेकर कुटुबीयांबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कौटुंबिक नैराश्यातून त्यांनी आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज संगमनेर शहर पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच संगमनेर शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट घेत दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी कॉटेज हॉस्पिटल येथे पाठवले आहेत.

दरम्यान, या पती-पत्नीच्या मृतदेहाजवळ पोलिसांना दोन चिठ्ठ्या आढळून आल्या आहेत. वाडेकर मुलाचा पुणे येथे जो मृत्यू झाला होता, त्यात पुणे जिल्ह्यातील वाकड पोलिसांविषयी नाराजीचा काही मजकूर असल्याची चर्चा परिसरात होती. गणेश वाडेकर हे संगमनेर नगरपालिकेतून सध्या सेवानिवृत्त झाले होते. तर त्यांची पत्नी गौरी वाडेकर या आरोग्य विभागात कार्यरत होत्या. एकाच कुटुंबातील तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी मृत दाम्पत्याच्या अवघ्या सोळावर्षीय मुलाने देखील घरातच आत्महत्या केली होती. तर, ८ दिवसांपूर्वी २१ वर्षीय मोठ्या मुलाने पुण्यात गळफास घेत आत्महत्या जीवन संपवले. त्यानंतर या दोघांच्या जन्मदात्यांनीही आत्महत्या केली आहे, त्यामुळे अख्ख्या कुटुंबानेच आत्महत्या करुन जीवन संपवल्याची धक्कादायक आणि मन सुन्न करणारा प्रकार संगमनेरमध्ये घडला आहे.

उजनीतून भीमेच्या विसर्गात घट ; १६ हजार ६०० क्युसेक विसर्ग

पुणे । प्रतिनिधी

उजनी धरणातून भीमा नदीमध्ये सोडण्यात येणार्या विसर्गात सातत्याने घट करण्यात येत असून, रविवारी (दि. १) सायंकाळी ७ वाजता विसर्गात घट करून तो १६ हजार ६०० क्युसेक एवढा करण्यात आला. त्यामुळे याआधी इंदापूर तालुक्यातून वाहणार्या भीमेचे पाणी नदीपात्रा बाहेरून वाहत होते. विसर्गात घट झाल्याने रविवारी हे पाणी पात्रातून वाहतानाचे चित्र पाहावयास मिळत आहे.

LOKMAT AGRO.COM

उजनी धरणामध्ये रविवारी सायंकाळी ७ वाजता ११९.२६ टीएमसी एवढा साठा असून, धरण १०३.७९ टक्के क्षमतेने भरलेले आहे. दौंड येथून उजनी धरणामध्ये येणार्या पाण्याचा विसर्ग आता कमी होऊन तो ९ हजार ९२२ क्युसेक एवढा सध्या आहे. दुसर्या बाजूला इंदापूर तालुक्यातून वाहत असलेल्या निरा नदीचे पाणीही आता नदीपात्रात उतरल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले. दरम्यान तुडुंब भरलेले नदीपात्र बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

लांडेवाडी निघोटवाडी येथे जरांगे पाटील यांचे जोरदार स्वागत

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यात लांडेवाडी, निघोटवाडी- मंचर फाटा येथे सोमवारी (ता.२) संध्याकाळीमराठा समाजाचे मराठा क्रांती योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

लांडेवाडी येथे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव लांडे, लांडेवाडी गावच्यासरपंच संगीता शेवाळे, सुनील बाणखेले, रवींद्र करंजखेले,तान्हाजी शेवाळे,जानकू पानसरे, खंडेराव आढळराव, रामदास आढळराव, आदी मान्यवरांनी व गावकऱ्यांनी जोरदार स्वागत केले. यावेळी जरांगे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून

अभिवादन केले. यावेळी उपस्थित जनसमुदायानेजय भवानी जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा अशा घोषणा दिल्या.

निघोटवाडी- मंचर फाट्यावर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या तालुकाप्रमुख सुरेखा अनिल निघोट, माजी सरपंच निशा निघोट, उषा चिंचपुरे, शामराव निघोट, गणेश राव खानदेशी, प्रा अनिल निघोट यांच्यासह अनेक मान्यवरांनी जरांगे पाटील यांचे फटाक्याची अताशबाजी, ढोल ताशा व घोषणाबाजी करून जोरात स्वागत केले . यावेळी जरांगे पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाला शुभेच्छा देण्यासाठी युवक युवतीप्रमाणेच ज्येष्ठ नागरिकही उपस्थित होते.

पिंपरी चिंचवडमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा तब्बल १०० फुटी पुतळ्याला तडे; पालिकेचं स्पष्टीकरण, म्हणाले, 'असा निष्कर्ष काढणं चुकीचं...'

पुणे । प्रतिनिधी

मालवणमधील राजकोट किल्ल्यावर बांधण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दुर्घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. एकीकडे हा पुतळा कोसळलेला असतानाच दुसरीकडे पिंपरी चिंचवडमधून कोट्यवधी रुपये खर्च करून पिंपरी चिंचवडमध्ये उभारला जात असलेला छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला उभारणी आधीच तडे गेले आहेत, त्यामुळे पुतळा उभारणीचं काम निकृष्ट दर्जाचं होतंय का? असा सवाल उपस्थित झाला होता. याबाबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानं उलट-सुलट चर्चा रंगलेल्या आहेत.

पिंपरी चिंचवडमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा तब्बल १०० फुटी पुतळा उभारला जात आहे. मात्र पुतळा उभारण्यापूर्वी महाराजांच्या पायाला तडा गेला. तसा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानं उलट-सुलट चर्चा रंगलेल्या आहेत. महापालिका या पुतळ्यासाठी एकूण ४७ कोटींचा खर्च करणार आहे. दिल्लीमध्ये या पुतळा साकारून याचे पार्ट पिंपरीत आणले जात आहेत. हा पुतळा प्रत्यक्षात उभारायला २०२५ उजाडेल असं पालिलेकडून



सांगण्यात येत आहे. मात्र तत्पूर्वीच पायाला तडा गेल्यानं हे काम निकृष्ट दर्जाचे आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातोय. मात्र याबाबत आत्ताच असा निष्कर्ष काढणं चुकीचं ठरेल, असं पालिकेने स्पष्टीकरण दिलं आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये शंभू सृष्टी उभारली जााणार आहे. या शंभू सृष्टीमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा १०० फूट उंच पुतळा कास्य धातूमध्ये उभा केला जाणार आहे. मात्र, हा पुतळा ज्या पायावर उभारला जाणार आहे तो पायांनाच तडे गेले आहेत. या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत.

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुतळा कोसळला

कोकणातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा भारतीय नौदलाने उभारलेला पुतळा कोसळल्याची दुर्घटना घडली होती. या घटनेमुळे एकच खळबळ माजली असून राज्य सरकार आणि केंद्र सरकारविरोधात टीकेची झोड उठली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचा पुतळा इतक्या निकृष्ट दर्जाचा कसा उभारला जाऊ शकतो, असा सवाल सामान्य नागरिक विचारत आहेत.

या निवेदनात भारतीय नौदलाकडून सांगण्यात आले आहे की, ४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनी सिंधुदुर्गवासियांना अर्पण केलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सोमवारी दुर्दैवीरित्या जे नुकसान झाले त्याविषयी आम्हाला अतीव दु:ख आहे. राज्य सरकार, संबंधित तज्ज्ञमंडळी आणि नौदलातील अधिकाऱ्यांचे पथक तातडीने या दुर्घटनेचे कारण शोधण्यासाठी काम सुरु करेल. ही दुर्दैवी दुर्घटना होती. छत्रपती शिवरायांचा पुतळ्याची दुरुस्ती करुन तो पुन्हा राजकोट किल्ल्यावर लवकरात लवकर बसवला जाईल, असे भारतीय नौदलातर्फे सांगण्यात आले.

महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळणार का? पंकजा मुंडे स्पष्टपणे म्हणाल्या...

पुणे । प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोठी तयारी सुरू केली आहे. पक्षातील अनेक मोठ्या नेत्यांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. अशातच भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्यावर पुण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अशातच आज पंकजा मुंडे यांनी पुण्यात पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली, त्यावेळी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, भाजपच्या अनेक नेत्यांना वेगवेगळ्या विधानसभांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. हा संघटनेचा दौरा आहे. १०० ते १५० पदाधिकारी बैठकीला असतील आणि त्यांच्याशी संवाद साधायचा आहे. विधानसभेची ही पूर्व तयारी आहे. तर आता एका मतदारसंघात अनेक उमेदवार इच्छुक असतात त्यातून कसा मार्ग काढणार या प्रश्नावरतीही त्यांनी उत्तर दिलं आहे.

चिंचवड विधानसभेत इच्छुकांची गर्दी मोठी आहे त्यातून कसा मार्ग काढणार? या प्रश्नावर उत्तर देताना पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रत्येकवेळी भाजप मार्ग काढतोच, आम्हाला इच्छुकांची यादीतून एकाचं नाव द्यावं लागतं. याची प्रॅक्टिस कोअर कमिटीला आहे, ते यातून तोडगा काढतील, असं त्यांनी म्हटलं आहे.

पिंपरी विधानसभा क्षेत्रात इच्छुक उमेदवारांची मोठी गर्दी

पिंपरी विधानसभेत विद्यमान आमदार अण्णा बनसोडे हे पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून विधानसभा निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. त्याचबरोबर सध्या भाजपात असलेल्या सीमा साळवे या अजित पवार

गटाकडे पिंपरी विधानसभेची जागा मागण्याची शक्यता आहे. पिंपरी विधानसभा क्षेत्र हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे, हा विधानसभा क्षेत्र जेवढा विकसित आहे. तेवढाच मागासलेला देखील आहे.

महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळणार का?

महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळणार का? या प्रश्नावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या तुम्ही माझ्याकडून बातमी काढू नका, असं म्हणत त्यांनी या प्रश्नाचं उत्तर देणं टाळलं आहे.

चिंचवड विधानसभा भाजपचा बालेकिल्ला मात्र राष्ट्रवादीकडून दावेदारी

चिंचवड विधानसभा स्वर्गीय आमदार लक्ष्मण पांडुरंग जगताप यांचा बालेकिल्ला मानला जायचा. त्यांच्या अकाली निधनानंतर चिंचवड विधानसभेत पोट निवडणूक झाली आणि त्या पोट निवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप ह्या आमदार म्हणून निवडून आल्या. कधीकाळी चिंचवड विधानसभा क्षेत्रात लक्ष्मण जगताप हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अप्रत्यक्ष पाठिंब्याने निवडून यायचे. मात्र त्यांनी २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपत प्रवेश केला होता, त्यानंतर चिंचवड विधानसभा क्षेत्र हा एक प्रकारे भाजपचा बालेकिल्ला झाला.

विधानसभा निवडणुकीत देखील नाना काटे हे अजित पवार गटाकडे चिंचवड विधानसभेची उमेदवारी मागण्याची शक्यता आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण पांडुरंग जगताप यांचे धाकटे बंधू शंकर पांडुरंग जगताप यांची चिंचवड विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. त्याचबरोबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाकडून अश्विनी जगताप यांना परत विधानसभेची संधी दिली जाण्याच शक्यता आहे. त्याचबरोबर शंकर पांडुरंग जगताप यांनी देखील भाजपच्या तिकिटावर चिंचवड विधानसभा निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली आहे. महायुती सध्या अजित पवार देखील सहभागी असल्याने चिंचवड विधानसभा जागेवर अजित पवारांचा गट देखील दावेदारी करण्याची शक्यता आहे.